REGISTERED No. B. 3434






# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ११ फेब्रुवारी १९४८ अंक ६


गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

**दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि.** पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठी व विम्यासाठी चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

**वि ज य**

**टेक्स्टाइल्स लि.**

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगिण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









## विविध माहिती

**ब्रह्मदेशांतील लढाई कोणी जिंकली ?**—वार्नर ब्रदर्स ह्या अमेरिकन फिल्म कंपनीनें 'ऑब्जेक्टीव्ह बर्मा' ह्या नांवाचा बोलपट मलायांत दाखविण्याचे आपण होऊन बंद केलें आहे. अतिपूर्वेंतील लष्करी अधिकाऱ्यांनीं ह्या बोलपटाबद्दल सिंगापूरच्या सरकारकडे तक्रार केली होती. ह्या बोलपटामुळें ब्रह्मदेशांतील लढाई अमेरिकन लष्करानें जिंकली असा ग्रह निर्माण होत असल्यामुळें चिनी प्रेक्षकांत ब्रिटिश सरकारची इभ्रत राखणें कठीण जातें, असें ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें.

**हिंदुस्थानांतील अखेरचें ब्रिटिश लष्कर**—फेब्रुआरी २० रोजीं 'एम्प्रेस ऑफ ऑस्ट्रेलिया' ह्या बोटीनें हिंदुस्थानांतील शेवटच्या ब्रिटिश लष्कराच्या तुकड्या ब्रिटनला रवाना होणार आहेत.

**युद्ध झालें, तर तेलाची टंचाई**—आज युद्ध झालें तर अमेरिकेजवळ लष्कराला लागणाऱ्या तेलाच्या पुरवठ्यापैकीं फक्त २ आठवडे पुरेल येवढेंच तेल आहे, अशी माहिती अमेरिकन प्रतिनिधी-मंडळाच्या लष्करी समितीच्या एका सभासदानें सांगितली. समितींतील इतर सभासदांचेंही असेंच मत आहे.

**ब्रिटिश पोस्ट कामगारांना बक्षिसें**—सप्टेंबर १९४७ अखेरच्या तिमाहींत ब्रिटिश पोस्टांतील कामगारांना, उपयुक्त सूचना केल्याबद्दल ५,२४० रुपये बक्षिसादाखल वाटण्यांत आले. ह्यापैकीं बहुतेक सूचना 'टेली-कम्युनिकेशन्स' बद्दलच्या तांत्रिक बाबींसंबंधी होत्या. ही बक्षिसांची योजना १९०६ सालीं सुरू करण्यांत आली. आतांपर्यंत एकंदर १,१८,००० सूचना आल्या व त्यासाठीं ५,१३,००० रुपये वाटण्यांत आले.

**ऑलिंपिक गेम्ससाठी व्यवस्था**—जुलै १९४८ मध्यें ब्रिटनमध्यें भरविण्यांत येणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांसाठीं २,७६० नव्या टेलिफोन्सच्या लाइन्सची व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या योजनेचें काम मे १९४७ मध्यें सुरू झालें व सामन्यांच्या आधीं थोडे दिवस ते पुरें होईल. ह्या व्यवस्थेसाठीं ४ मैल लांबीच्या मोठ्या तारा आणि ३० मैल लांबीच्या सहाय्यक तारा लागतील.

**मलेरियाची हकालपट्टी**—हिंवतापाचा, डांस चावून ताप येण्यापूर्वींच त्याचा बंदोबस्त करता येण्याचे प्रयोग ब्रिटनमध्यें यशस्वी झाले आहेत असें समजतें. डांस चावल्यावर रक्तांत मलेरिआच्या जंतूंची वृद्धी होईपर्यंत काय होतें, ह्याचें ज्ञान आजपर्यंत डॉक्टर्सना नव्हतें. डांस आणि माकडे ह्यांच्यावर केलेल्या प्रयोगामुळें हें ज्ञान होऊन हिंवतापाचे जंतू नाहींसे करण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे.

**सिंघानिआ यांच्या शिष्यवृत्त्या**—सर पद्मपाद सिंघानिआ हे आपल्या वडिलांच्या संस्मरणार्थ दरवर्षीं २५,००० रुपये शिष्यवृत्त्यासाठी देणगी म्हणून देत असतात. १९४८-४९ सालींही अशाच शिष्यवृत्त्या देण्यांत येणार आहेत.

**ॲटम बॉम्बचें घाऊक उत्पादन**—अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशननें अणु-बॉम्बचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याचें आपलें उद्दिष्ट असल्याचें सूचित केलें आहे. ॲटम बॉम्बच्या नव्या तऱ्हा शोधून काढण्यांतही अमेरिकेंत प्रगति झाली आहे.

**काळपुळीवर नवा उपाय**—ऑस्ट्रेलिआंतील ७० वर्षांचे एक वृद्ध डॉक्टर मि. बॉड ह्यांनी काळपुळीवर एक नवीन उपाय शोधल्याचें समजतें. ह्या उपायाचें नक्की स्वरूप समजलेलें नाहीं. परंतु, काळपुळीच्या फोडाकडे आकर्षिलें जाणारें एक औषध रोग्याच्या शरीरांत टोचलें जातें आणि मग तो फोड अगर गांठ कापून बाहेर काढली जाते, असें म्हणतात.

### ता. १८ चा अंक बंद

**महात्माजींच्या अस्थिविसर्जनानिमित्त "अर्था" चा येता, बुधवार ता. १८ चा अंक बंद राहील.**

### आजच्या अंकाची पुरवणी

आजच्या अंकाबरोबर ४० पृष्ठांची "सहकारी परिषद पुरवणी" आमच्या वाचकांस देण्यांत आम्हांस आनंद होत आहे. हिंदी आर्थिक प्रगतीचे कार्मी सहकारी संघटनेचें महत्त्व किती आहे हें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. परंतु, ऑल इंडिआ कॉंग्रेस कमिटीनें नेमलेल्या नेहरू समितीच्या रिपोर्टाचा सारांश आजच्या अंकांत इतरत्र देण्यांत आला आहे. त्यावरून सहकारी संस्थांस नव्या हिंदुस्थानच्या उभारणींत दिलेल्या स्थानाची कल्पना येईल. शेती व ग्रामोद्योग ह्यांतच केवळ नव्हे, तर शेतीच्या आणि कारखानदारीच्या मालवांटपांत सहकारी पद्धतीस प्राधान्य द्यावें, असें नेहरू समितीनें सुचविलें आहे. ह्या रिपोर्टावर ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींत लवकरच चर्चा होईल व हिंदुस्थान सरकारचें धोरण तिचे अनुरोधानें आंखलें जाईल हें उघड आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तें धोरण येण्यास थोडा वेळ लागला, तरी त्याची प्रवृत्ति लक्षांत घेण्याजोगी आहे. अशा परिस्थितींत सहकारी कार्यकर्त्यांवर जशी मोठी जबाबदारी येऊन पडणार आहे, तशीच त्यांस सेवेची संधीहि पण मोठी मिळणार आहे. राष्ट्राच्या संक्रमण काळांत खऱ्या सहकारी वृत्तीची अत्यंत आवश्यकता आहे; किरकोळ मतभेदांस आतां थारा देता कामा नये. सहकारी संघटनेचे हातून भरीव कामगिरी घडो, असेंच सर्व सहकारी कार्यकर्त्यांस वाटेल, हें उघड आहे. महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेचा तपशीलवार वृत्तांत वाचकांस उद्बोधक वाटेल अशी अपेक्षा आहे.

### दि प्रेसिडेन्सी इं. बँक लि., पुणें

**४४ हजार रु. नफा; ३½% डिव्हिडंड**

वरील बँकेस गेल्या वर्षी शेडयूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाल्याचें प्रसिद्धच आहे. तिचें वसूल भांडवल ७,११,८९० रु. असून खेळतें भांडवल ६६½ लक्ष रु. आहे. रिझर्व्ह फंडांत व इतर फंडांत ८० हजार रु. आहेत. १९४७ सालीं बँकेनें इनकमटॅक्स वजा जांतां २,३७,५५५ रु. व्याज मिळविलें व १,१९,८३० रु. व्याज दिलें. कमिशनच्या व इतर मार्गांनीं बँकेस ८,९०६ रु. मिळाले. व्यवस्थेचा व इतर खर्च वजा जाता ४३,७७५ रु. निव्वळ नफा उरतो. त्यांतून २४,६७४ रु. ३½% करमाफ डिव्हिडंडला लागतील आणि करांसाठी ८,००० रु. राखून ठेवले आहेत. बाकी शिलकी नफा रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आला आहे. साठे बंधु बिस्किट व कोको कारखान्यांचे मालक श्री. ग. रा. साठे हे बँकेचे चेअरमन असून श्री. आण्णासाहेब चितळे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. जी. डी. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. हे मॅनेजर आहेत. श्री. एल. एम. जोशी, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., हे मुंबई शाखेच्या सल्लागार मंडळाचे चेअरमन आहेत.

**प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचा एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर**

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटसाठी नव्या कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येणार आहे. तो इन्स्टिटयूटचें मुंबई येथील सहकारी विद्यालय चालवून विभाग सहकारी विद्यालयांवर व वर्गांवर देखरेख करील. जागेचा पगार ३००–२०–५०० रु. आहे. अर्ज २१ फेब्रुवारीचे आंत इन्स्टिटयूटच्या ऑ. सेक्रेटरीकडे पोचले पाहिजेत.

# अर्थ

बुधवार, ता. ११ फेब्रुवारी १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

**श्रीपाद वामन काळे**

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


# नेहरू समितीच्या शिफारशींचें स्वरूप

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें नेमलेल्या नेहरू समितीच्या रिपोर्टाचा सारांश खाली दिला आहे. हा रिपोर्ट ऑ. इं. कॉ. कमिटीच्या बैठकींत चर्चिला जाईल.

### शेती

अन्न, कपास व बांधकामाचें साहित्य ह्यांचें किमान उत्पादन हाण्याची निश्चित योजना. शेतकरी व सरकार ह्यांचेमधील दलालांचें उच्चाटण. सहकारी संस्थांस प्रोत्साहन. शेतीच्या मूलभूत मालास किफायतशीर किंमती. किमान मजुरी. कर्जनिवारण. जमिनीची कायम स्वरूपाची सुधारणा करण्यासाठी सरकारी खर्चाची व्यवस्था. सुधारलेल्या शेतीच्या पद्धतींचीं प्रात्यक्षिकें. सहकारी वसाहती. सहकारी मल्टिपरपज सोसायट्यांची संघटना. जमीन कसणारे जमीनीचे मालक. जमिनीच्या कमाल क्षेत्रांवर बंधन; जादा जमीन खेड्यांतील सहकारी संस्थांचे स्वाधीन. तुकडे बंदी. जमीन महसुलाची जागा घेणारी शेतीच्या उत्पन्नावर कर आकारणारी करपद्धति. सहकारी सोसायट्या मार्फत चालणाऱ्या ॲग्रिकल्चरल फिनॅन्स कॉर्पोरेशन्स.

### उद्योगधंदे

अन्न, कापड, इत्यादींचें उत्पादन करणारे धंदे शक्य तोवर लहान प्रमाणावर सहकारी पद्धतीनें चालावेत. मशिनरीसारख्याच्या उत्पादनास मोठीं केंद्रे क्रमप्राप्तच आहेत. आर्थिक व सामाजिक हितास प्राधान्य देऊनच उत्पादनाचें केंद्र केवढें तें ठरविलें जाईल. लहान प्रमाणावरील केंद्रांस प्राधान्य मिळेल.

आपल्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीस अनुसरून, शक्य तितक्या लोकांना काम देण्याचा व महाग भांडवली मालाचा कमींत कमी अवलंब करण्याचा प्रयत्न केला जाईल. मोठ्या उद्योगधंद्यामुळें कार्यक्षमता वाढेल, अशी योजना आखावी लागेल. कांहीं विशिष्ट मालाचें उत्पादन उद्योगधंद्याच्या लहान घटांसाठीं राखून ठेवलें जाईल आणि त्यांची सरकार जपणूक करील.

### प्रादेशिक स्वावलंबन

सर्व प्रकारच्या उत्पादनाचें प्रादेशिक स्वावलंबन असावें असा प्रयत्न केला जाईल. देशाचे घटक भाग रोजच्या गरजांचे बाबतींत स्वावलंबी होणें अगत्याचें आहे. योग्य ठिकाणीं योग्य उद्योगधंद्यांस प्रोत्साहन देण्यासाठीं योग्य तें जकात धोरण अवलंबिलें जाईल. लहान प्रमाणावरील उत्पादनाचें नियंत्रण केवळ नफ्याचें उद्दिष्ट नसणाऱ्या सहकारी संघांकडे ठेवण्यांत येईल. प्राथमिक सोसायट्या, त्यांचेवर प्रादेशिक यूनिअन्स व त्यांचेवर फेडरेशन, अशी सहकारी संघटना करावी लागेल. खरेदी, विक्री, हत्यारें, देखरेख ह्या सर्वांची व्यवस्था सहकारी संघांनीं करावयाची आहे. ग्रामोद्योगांच्या वाढीसाठीं सहकारी सोसायट्यांमार्फत सरकारी कर्जे व मदत द्यावी, आणि ग्रामोद्योगांस सर्व तऱ्हेनें हातभार लावावा. एक कायम स्वरूपाचें संशोधन मंडळ ग्रामोद्योगांच्या सुधारणेकडे लक्ष देईल.

### राष्ट्रीयीकरण

संरक्षणास आवश्यक व मूलभूत महत्त्वाचे नवे औद्योगिक उपक्रम सरकारनें आपल्या मालकीखालीं स्थापन करावेत. जे धंदे मोनॉपोलीच्या स्वरूपाचे किंवा आंतरप्रांतीय स्वरूपाचे आहेत, त्यांचेवरहि सरकारची मालकी रहावी. ह्याला सरकारची पैशाची व इतर सिद्धता किती आहे, एवढीच मर्यादा राहील. सध्या जे धंदे खाजगी मालकीचे आहेत ते राष्ट्रीय मालकीचे होण्यास पांच वर्षांनंतर प्रारंभ व्हावा. ह्या अवधींत त्याची तयारी करावी. देशाच्या आर्थिक संसारांत व्यत्यय येणार नाहीं अशाच बेतानें हें स्थित्यंतर घडवून आणावें. सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत कंपन्यांना भरमसाट नफे होत आहेत, ते किंमती उतरल्यामुळें किंवा कायदेशीर योजनांमुळें खालीं योग्य पातळीवर आले म्हणजे राष्ट्रीयीकरणास सोईचा क्षण येईल. सरकारी मालकीचे होणारे धंदे कार्यक्षमतेनें चालविण्यास आवश्यक त्या सर्व योजना कराव्या लागतील. ह्या राष्ट्रीय धंद्यांवर सरकारी खात्यांचें धोरणाच्या प्रश्नापुरतें प्रभुत्व राहील; कायदेशीर स्वतंत्र संस्थामार्फत सरकारी कारखाने चालविण्यांत येतील. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांतील मॅनेजिंग एजन्सीची पद्धति नष्ट केली जाईल. राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें खाजगी मालकीच्या कारखानदारीस वळण लावण्यांत येईल. कारखान्यांत गुंतलेल्या भांडवलावर (भाग भांडवल अधिक गंगाजळी) किती नफा सुटावा, हें ठरविलें जाईल. ५% पेक्षां ज्यास्त डिव्हिडंडला बंदी करण्यांत येईल, आणि ही मर्यादा ज्या दिवशीं जाहीर केली जाईल त्या दिवसानंतर कंपन्यांनी रिझर्व्ह फंडांत किती कमाल रकम टाकावी हें निश्चित करून टाकलें जाईल. कोणत्याहि वर्षांत होणाऱ्या नफ्यापैकीं डिव्हिडंडसाठीं एकूण गुंतलेल्या भांडवलावरील ५% बाजूस काढल्यावर आणि आणखी कांहीं भाग सामाजिक उद्धाराच्या व औद्योगिक सुधारणेच्या योजनासाठीं राखून ठेवल्यावर उरलेला नफा भागीदार व कामगार ह्यांचेमध्यें सरकार सांगेल त्या प्रमाणांत विभागून दिला जाईल. गुंतविण्यास उपलब्ध असलेले पैसे सरकारी नियंत्रणाखाली आले पाहिजेत. फिनॅन्स कॉर्पोरेशन्स, बँका व विमा कंपन्या ह्यांचें राष्ट्रीयीकरण केलें जाईल.

नफ्यामध्यें कामगारांना हिस्सा देऊन, भांडवलदार व कामगार ह्यांचेमध्यें स्थिर मित्रत्वाचें नातें राखलें जाईल. कारखाने चालविण्याचे कामीं कामगारांचें सहकार्य वाढत्या प्रमाणावर घेतलें जाईल. किमान वेतन, रहाण्याची सोय, आजारीपण व बेकारी ह्यांचा विमा, इत्यादींकडे लक्ष देण्यांत येईल. शेतीच्या व कारखानदारीच्या उत्पादनाच्या किंमती नियंत्रित करून प्रत्यक्ष मालाचें वांटप सहकारी पद्धतीनें आखण्यांत येईल.

वरील शिफारशींप्रमाणें प्रत्यक्ष योजना हिंदुस्थान सरकारनें स्वीकारली, तर उद्योगधंद्यांत पैसे गुंतविणारांना कांहींच प्रोत्साहन उरणार नाहीं आणि आर्थिक प्रगतीस अडथळा मात्र निर्माण होईल अशी टीका उद्योगपती करीत आहेत; आणि तात्कालिक परिणामांच्या दृष्टीनें तर ती अगदी योग्यच आहे. परंतु सामान्य नागरिकांच्या उद्धाराचे योजनांच्या प्रचलित प्रवाहांच्या दृष्टीनेंच ह्या प्रश्नाकडे शेवटीं पहावें लागेल आणि हा उद्धार घडून येणें योजनेपेक्षा ती कार्यक्षमतेनें पार पाडण्यावर अवलंबून आहे.

# फ्रँकचा दर कां उतरविला ?

( स. वा. कोगेकर )

आंतरराष्ट्रीय चलननिधीचें एक प्रमुख सभासद्–राष्ट्र असलेल्या फ्रान्सच्या चलनाची परदेशीय चलनांतील किंमत शें. ८० टक्यांनीं उतरविण्यांत आली आहे. या घटनेमुळें युरोपांतील देशांत बरीच खळबळ उडाली आहे. वास्तविक पहातां फ्रान्सनें अंगिकारलेल्या धोरणांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. देशांतील अंतर्गत किंमती जेव्हां भरमसाट वाढूं लागतात त्यावेळीं हुंडणावळीचा दर पूर्वीचाच कायम राहिल्यास परदेशी मालाची आवक जास्त सोयीची होऊन देशी मालाच्या निर्यातीवर अनिष्ट परिणाम होतो. तसेंच आपली शिल्लक परदेशी चलनांत रूपांतरित करून घेऊन तिची किंमत टिकवून धरण्याचाही प्रयत्न होतो. पण या दोन्ही यत्नांमुळें हुंडणावळीचा दर टिकवून धरणें कठीण जाते, कारण त्या दरानें होणारी आयात आणि घटणारी निर्यात यांमधील अंतर सारखें वाढत जातें व परदेशांचीं देणीं फिटत नाहींत. यावर उपाय म्हणून अंतर्गत किंमती व बहिर्गत किंमती यांची संगति लागेल असा हुंडणावळीचा दर ठरविणें हा होय. अर्थात्, अंतर्गत किमतींतील वाढ कमी करून चालू हुंडणावळीचा दर टिकविणेंही विशिष्ट परिस्थितींत शक्य असतें. पण त्यासाठीं स्वदेशांत योजावयाच्या उपायांमुळें जनतेंतील कांहीं हितसंबंधांस बाध येणें संभवनीय असतें, व ही जबाबदारी अंगावर घेण्यास सरकारला विश्वास वाटत नसल्यास हुंडणावळीच्या दरांत बदल करणें हाच एक उपाय उरतो. त्याचाच अवलंब फ्रान्समधील सरकारनें केलेला आहे व आंतरराष्ट्रीय चलननिधीनें त्यास मान्यताहि दिली आहे.

या निर्णयामुळें चालूं परिस्थितींत फ्रान्सच्या दृष्टीनें महत्त्वाचे फरक होणार आहेत, येवढेंच नव्हे तर युरोपांतील इतर राष्ट्रांच्या आर्थिक जीवनावरही त्याचे परिणाम होतील. फ्रान्सपुरतेंच पाहिल्यास, नव्या हुंडणावळीच्या दरानें फ्रान्सचा माल विकत घेणें बाहेरील देशांस पूर्वीपेक्षां किफायतशीर होऊन फ्रेंच निर्यात वाढीस लागेल; तसेंच आयात माल महाग होऊन फ्रान्समध्यें येणाऱ्या मालावर आपोआप निर्बंध बसेल. त्यामुळें अंतर्गत उद्योगधंद्यांना चालना मिळेल व सरकारपुढें आज आ वासून उभ्या असणाऱ्या बेकारी, किंमतवाढ, इत्यादि प्रश्नांची तीव्रता कमी होईल. पण जागतिक व्यापारांत फ्रान्सचा माल स्वस्त झाल्यामुळें इतर देशांना त्याची स्पर्धा पूर्वीपेक्षां अधिक जाणवणार व त्यांच्या निर्यातीवर कांहीं अंशीं प्रतिकूल परिणाम होणार हें निश्चित.

हुंडणावळीच्या दरांत फरक करूनच फ्रान्सचें सरकार थांबलेलें नाहीं. आणखीही एक निर्णय घेण्यांत आला असून त्यामुळें सोन्याची व दुर्मिळ अशा परदेशी चलनाची देवाण–घेवाण कांहीं अंशीं खुल्या बाजारांत ठरेल त्या भावानें करूं देण्यास मोकळीक दिली आहे. आज दुर्मिळतेच्या बाबतींत डॉलरचा नंबर पहिला असून काळ्या बाजारांत त्याची फ्रँकमधील किंमत फारच वाढलेली आहे. फ्रान्समध्यें बेकायदेशीरपणें केलेले डॉलरचे साठेहि फार मोठे आहेत, असा समज असल्यामुळें हे साठे बाहेर यावे यासाठीं उपाय करणें आवश्यक झालें होतें. आतां डॉलरसाठीं खुला बाजार सुरू करण्यास परवानगी असल्यामुळें हे डॉलर बाहेर काढणें शक्य होईल असा सरकारचा अंदाज आहे. याप्रमाणें व्यवहार सुरू करण्यामुळें डॉलरची एक अधिकृत किंमत ( १ डॉ =२१४·३९२ फ्रँक ) व एक खुल्या बाजारांतील किंमत असे दोन दर अस्तित्वांत येतील. जें चलन दुर्मिळ नाहीं त्यांतील सर्व व्यवहार अधिकृत दरानेंच होणार असल्यामुळें डॉलरच्या मार्फतीनें त्याची खरेदी करणें फायदेशीर होणार आहे. या परिस्थितीमुळें इतर चलनांवर अनिष्ट परिणाम होऊन त्यांची किंमत खाली येण्याची भीति व्यक्त करण्यांत आली आहे. एक उदाहरण घेऊन ही भीति साधार असल्याचें दिसून येईल. समजा डॉलरची फ्रँकमधील मोड खुल्या बाजारांत ५०० फ्रँकप्रमाणें मिळाली, तर चार डॉलरच्या बदली २,००० फ्रँक मिळतील. आतां हे फ्रँक अधिकृत दरानें पौंडांत बदलले ( १ पौंड=८६४ फ्रँक ) तर २ पौंड ६ शिलींगहून थोडी अधिक रकम हातीं येईल. परंतु डॉलर व पौंड यांतील अधिकृत दर १ पौं = ४ डॉ. हा असल्यामुळें अशा तऱ्हेनें फ्रँकमार्फत बदललेले डॉलर याहून जास्त किंमतीचे ठरतील व पौंडाची किंमत तितक्या प्रमाणांत कमी ठरेल. हे व्यवहार मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यास ब्रिटिश सरकारला पौंडाचा सध्यांचा दर टिकविणें अशक्य होईल. तसेंच ब्रिटिश माल थेट ब्रिटनपासून न घेतां तो फ्रान्सच्या मार्फत घेण्याची प्रथा सुरू होऊन तिचा परिणामही ब्रिटिश व्यापारास प्रतिकूल होईल. अशा तऱ्हेनें खुल्या बाजारांत विकले जाणारे डॉलर फ्रेंच निर्यात व्यापाऱ्यांस मिळणाऱ्या डॉलरांच्या निम्म्याहून अधिक रहाणार नाहींत तरी सुद्धा अप्रत्यक्षपणें खुल्या व्यापाराचें क्षेत्र वाढणें अशक्य होणार नाहीं. यामुळेंच फ्रँकचा भाव कमी झाल्यापेक्षांही या खुल्या बाजाराच्या निर्मितीस ब्रिटिश सरकारतर्फें विरोध करण्यांत आला होता, परंतु तो फ्रान्सनें जुमानला नाहीं.

आंतरराष्ट्रीय चलननिधीनेंही या दुसऱ्या निर्णयास विरोध केला असून त्यामुळें चलनांच्या किंमतींत होणारा पक्षपात निधीच्या मूलभूत तत्त्वांना हरताळ फासणारा आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. फ्रान्सप्रमाणें प्रत्येक देशानें जर आपल्या सोयीप्रमाणें चलनाच्या किंमतींत चढउतार सुरू केला तर आंतरराष्ट्रीय व्यवहारांत गोंधळ माजून जागतिक व्यापारांत घट येईल अशी भीतिहि प्रदर्शित केली जाते.

फ्रान्सच्या चलनाविषयक निर्णयामुळें युरोपियन राजकारणावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः पश्चिम युरोपची संघटना करण्याची जबाबदारी फ्रान्स व ब्रिटन या दोन देशांनीं पत्करल्यामुळें त्यांच्यांत आर्थिक वितुष्ट आल्यास राजकीय सहकार्यही कठीण जाईल. अमेरिकेनें देऊं केलेल्या मदतीवर मात्र कांहीं परिणाम होईल असें तूर्त तरी दिसत नाहीं.

---

### बँकिंग व विमा कायदा दुरुस्ती स्थगित

बँकिंग कंपन्यांबाबत कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल जुन्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मांडण्यांत आलें होतें व त्या बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्टहि तयार झाला होता. सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणें दुरुस्त झालेलें बिल डोमिनियन पार्लमेंटांत मांडण्याचा अर्थमंत्र्यांचा विचार होता. परंतु बदललेल्या परिस्थितींत त्यांत बऱ्याच सुधारणा कराव्या लागल्या असत्या. म्हणून जुनें बिल रद्द करून एक नवें व्यापक बिल मांडण्याचा सरकारचा निर्णय अर्थमंत्र्यांनीं जाहीर केला. १९३८ च्या इन्शुअरन्स बिलांत दुरुस्ती करणारें बिलहि व्यापार मंत्र्यांनीं काढून घेतलें. त्याऐवजीं नवें व्यापक बिल सादर करण्यांत येईल.

युनियन बँक ऑफ बर्मा—वरील बँकेचें उद्‌घाटन ब्रह्मी अर्थमंत्र्यांनीं ता. ३ फेब्रुवारी रोजीं केलें. ब्रह्मी करन्सी बोर्डाचें काम बँकेकडे जाईल.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान ५ वें, ता. ३०-१०-४७

## शेतीच्या धंद्याची सुधारणा

( श्री. श्री. वा. काळे )

"हिंदी शेतकऱ्याचें दारिद्र्य नाहींसें होऊन त्याच्या रहाणीचें मान सुधारण्याचें सर्वांत महत्त्वाचें साधन म्हणजे शेतीच्या उत्पादनांत वाढ होणें हें होय. हिंदी शेतीची ह्या संबंधींतील परिस्थिति अत्यंत निराशाजनक आहे. पाऊसपाण्यावर आपलें वर्चस्व चालू शकत नाहीं आणि धरणें व कालवे तयार होण्यास कितीतरी दीर्घकाल लागेल. तोंपर्यंत आपणांस आयात होणाऱ्या धान्यावर विसंबून रहावें लागणार आहे. इतर देश आपणांकडे धान्य पाठविण्यास तयार आहेत असें मानलें तरी त्याची किंमत देणें आपल्याला परवडणार नाहीं. विदेशी धान्याची किंमत एकसारखी वाढत चालली आहे. १९४६ चे मानानें १९४७ सालीं धान्य बाहेरून अधिक आलें नाहीं तरी पैसे मात्र ज्यास्त द्यावे लागत आहेत आणि १९४८ सालीं तो आकडा अधिकच वाढणार आहे " हिंदी उत्पादनामध्येंच आपण भागविलें पाहिजे, परंतु लोकांना पुरेसें खावयास तर मिळालें पाहिजे " असें धोरण सरकारनें आखण्याची वेळ आतां आली आहे.

"भूकबळींवरून आपण आपल्या परिस्थितीचें गांभीर्य ठरवितों, अशी अद्याप स्थिति आहे. तथापि, ग्रेट ब्रिटनसारख्या राष्ट्रांतील लोकांस अजूनहि युद्धापूर्वीइतकेंच सकस अन्न खावयास मिळत आहे. अत्यंत अडचणींत सापडलेल्या राष्ट्राची ही परिस्थिति आहे, ह्यावरून शेतीप्रधान अशा आपल्या राष्ट्रास किती मजल गाठली पाहिजे, ह्याची कल्पना करतां येईल. हिंदी उत्पादनाच्या १९४१च्या अधिकृत आकड्यांवरून असें दिसून येतें, कीं हिंदी लोकांस पुरेसा अन्नपुरवठा होणें असेल, तर पुरवठा पुष्कळच वाढला पाहिजे. किती वाढ आवश्यक आहे, हें खालील आकडे स्पष्ट करतात:—

| | आवश्यक वाढ |
|---|---|
| धान्य | १२% |
| डाळी | २०% |
| स्निग्ध द्रव्यें | २५०% |
| फळें | ५०% |
| भाज्या | १००% |
| दूध | ३००% |
| मासे व अंडीं | ३००% |

जनावरांच्या सुधारणेसाठी पेंडीच्या पुरवठ्यांत ४००% व वैरणीच्या पुरवठ्यांत ५५% वाढ झाली पाहिजे.

"वरील अंदाज करण्यांत आले तेव्हां हिंदुस्थान अखंड होता. आतां पाकिस्तानामध्यें तुलनेनें अधिक धान्य पिकविणारी जमीन समाविष्ट झाली असल्याकारणानें अन्नपुरवठ्याची परिस्थिति अधिकच बिकट झाली आहे. त्यांतच, अन्नधान्यें व व्यापारी पिकें ह्यांचेमध्यें समतोलपणा राखण्याचा अवघड प्रश्नहि आपणांस सोडवावयाचा आहे. कपाशीसारखीं पैसा दिणारीं पिकें वाढल्याविना क्रयशक्ती फारशी सुधारणार नाहीं. गळिताच्या धान्यांचे संबंधांतहि असाच प्रश्न निर्माण झाला आहे. गळिताच्या धान्यांस सर्व जगभर प्रचंड मागणी आहे परंतु ती पुरविण्याचें प्रयत्नांत आपणांस अन्नधान्याखालील क्षेत्र कमी करून भागणार नाहीं. गळिताचीं धान्यें निर्गत करून त्याचे पैसे मिळवावयाचे, का त्यांचा औद्योगिक उपयोग स्वदेशांतच करावयाचा, ह्याचाहि नीट विचार होण्याची वेळ आतां आलेली आहे.

"मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी मुंबईच्या युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड सोशॉलॉजीच्या रौप्यमहोत्सवाचे प्रसंगीं शेतीविषयक धोरण व संशोधन ह्या विषयावर एक माहितीपूर्ण व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं वरील प्रश्नांची चर्चा करून, शेतीच्या सुधारणेस संशोधनाची व नियोजनाची किती आवश्यकता आहे, हें स्पष्ट केलें. हिंदी शेतीचें दर एकरीं उत्पादन घटत चाललें असून शेतीचें दरमाणशीं क्षेत्रहि संकुचित होत आहे. ह्यास उपाय म्हणून एकतळी शेतीची व तुकडेबंदीची योजना मुंबई सरकारनें केली आहे. शेती मोठ्या प्रमाणावर केली पाहिजे असें सांगण्यांत येतें; परंतु शेतीस आवश्यक तेवढींच माणसें त्या धंद्यांत गुंतलीं तर बाकीच्या कोट्यवधी लोकांना दुसरा व्यवसाय पाहून द्यावा लागेल. हें काम कांहीं सोपें नाहीं. शेतकामासाठी यंत्रांचा उपयोग करावा किंवा नाहीं, खताचा पुरवठा कसा करावा, बांधबंधाऱ्यांची योजना कशी आखावी, कर्जबाजारीपणाचा प्रश्न कसा सोडवावा, किंमतींचें नियंत्रण कसें करावें, इत्यादि प्रश्नहि अत्यंत निकडीचे असेच आहेत.

"ह्या सर्वांपेक्षा महत्त्वाचा प्रश्न जमीनधारणा पद्धतीमधील सुधारणेचा आहे. शेतकऱ्यास शेतीबद्दल आत्मीयता वाटण्यास व सुधारणांस वाव मिळण्यास त्यामुळें पुष्कळच मदत होणार आहे. परंतु सध्याची जमीनधारणा पद्धत बदलून नवी पद्धति घालून देण्यांत व त्यामुळें बसलेली घडी विस्कटण्यांत धोकेहि बरेच आहेत. जमीनधारणेचे कित्येक सहकारी प्रयोग करता येण्याजोगे आहेत. परंतु प्रयोगांत येणारें नुकसान सरकारनें सोसलें पाहिजे, हें उघड आहे.

"शेतीच्या धंद्याच्या सुधारणेचा प्रश्न जितका निकडीचा, तितकाच तो बिकट आहे आणि तो सुटण्यास अनेक दृष्टींनें सुधारणा व्हावयास पाहिजे. त्यांत वैयक्तिक मनुष्यबळांत वाढ व व्यक्तींच्या गुणांत सुधारणा, ह्यास महत्त्व विशेष आहे. इतर देशांतील लोकांच्या व आपल्या लोकांच्या मानसिक दृष्टिकोनांत फरक का व कसा आहे हें पाहून दारिद्र्य, मागसेलपणा, शिक्षण हें गोंधळी चक्र नष्ट केलें पाहिजे; वृत्तींत सुधारणा घडवून आणली पाहिजे. उद्योगधंद्यांच्या वाढीसहि हेच विचार लागू पडतील. स्वदेशी धान्य व स्वदेशी माल ह्यांची सुबत्ता होण्यासाठी स्वदेशीची चळवळ पुनः आवश्यक झाली आहे. ह्यासंबंधांत अखिल भारतीय दृष्टिकोण समोर ठेवून आपल्या प्रांताच्या प्रगतीसहि आपण प्राधान्य दिलें पाहिजे; थोडक्यांत म्हणजे आर्थिक प्रगतींत आपणांस पुढारीपण मिळालें पाहिजे. आपल्या प्रांतांतील धरणांच्या योजनांस ह्यासाठीच आपण पाठिंबा दिला पाहिजे. प्रांतिक अभिमानाचा हा प्रश्न नसून, व्यापक हित साधतांना स्वतःची किमान गरज असंतुष्ट ठेवण्याची चूक न करण्याचा हा साधा, सरळ व व्यावहारिक प्रश्न आहे."

---

**सावकारी नियंत्रण कायदा ( थोडक्यांत गोषवारा )**

( लेः—श्री. पां. म. भाटे, वकील, कराड, जि. सातारा. )

( पृ. सं. १६. किं. ८ आ. )

मुंबई सरकारचे कायदे लोकांना सुटसुटीतपणें व सुलभ रीतीनें समजावून सांगण्याचा प्रयत्न कराडचे श्री. पांडुतात्या भाटे, वकील ह्यांनीं चालविला आहे. प्रस्तुत पुस्तिकेंत सावकारी कायद्यासंबंधीं 'थोडक्यांत सर्व' माहिती सूचक सदरांखालीं एकत्रित करून दिलेली आहे ती सावकार व कर्जदार ह्या दोघांनाहि उपयुक्त वाटेल.

### पुणें दुष्काळ निवारण समितीचा अहवाल

१९४५–४६ मध्यें पुणें जिल्ह्याच्या पूर्व भागांत पाऊस असमाधानकारक पडल्यामुळें तेथील सुमारें २२५ गांवें दुष्काळी परिस्थितीच्या तडाख्यांत सांपडलीं. दुष्काळग्रस्त भागांतील लोकांना सहाय्य करण्याकरितां पुणें सें. को. बँकेच्या विश्रामस्थान्यांत ता. १५–३–४६ रोजीं श्री. शं. शा. मोरे ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरली, तिनें प्रि. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखालीं पुणें जिल्हा दुष्काळ निवारण समिति स्थापन केली. समितीचें एक लहानसें कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें, तिच्यांत वेगवेगळ्या पक्षांचे कार्यकर्ते घेऊन तें पूर्णपणें प्रातिनिधिक बनविण्यांत आलें. कामाच्या सोईसाठीं समितीनें आरोग्य, शेतकी व निधी अशा ३ उपसमित्या नेमल्या. समितीस सुमारें ८ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळाली. त्यांतील ५½ हजार रु. शिल्लक आहेत. पुणें जिल्ह्यासाठीं दुष्काळासारख्या आपत्तींत काम करण्यासाठीं कायमची योजना करून शिलकी रकम त्या संस्थेच्या आतां स्वाधीन करण्यांत आली आहे. दुष्काळ निवारण समितीनें केलेल्या उपयुक्त कार्याचा तपशीलवार अहवाल हिशेब तपासनिसांनीं तपासलेल्या हिशेबाच्या तक्त्यासह प्रसिद्ध करण्यांत आला आहे. समितीच्या चिटणिसांपैकीं ( श्री. य. द. खोले, श्री. अ. गो. आवटे श्री. द. वा. आंबेकर व श्री. बी. व्ही. कुंभारे ) श्री. खोले ह्यांच्या विशेष परिश्रमांची माहिति अहवालांत न येणें योग्यच असलें, तरी त्यांचा गौरवपर उल्लेख येथें करणें युक्त होईल.

---

### होळकर संस्थानाच्या सहकारी खात्याचा अहवाल
### ( १९४५–४६ )

बजेटांत तरतूद असूनहि इंदूरच्या सहकारी खात्यास सर्व अधिकारी बळाच्या व आर्थिक तरतुदीचा पुरेपूर फायदा घेता आला नाहीं असें ह्या वर्षीहि घडून आलें. संस्थानांत आतां १,०११ सोसायट्या असून त्यांपैकीं ६ मध्यवर्ती बँका, ९०४ शेतकी सोसायट्या व १०१ बिगर शेतकी सोसायट्या आहेत. शेतकी पतपेढ्यांपुरता विचार केला तर प्रत्येक पतपेढींत सरासरीनें २२ सभासद असून कर्जाची सरासरी १३० रु. पडते. कर्जावरील व्याजाचा दर सरासरीनें १२% पडतो. सहकारी चळवळीच्या प्रगतीस आवश्यक अशा कांहीं योजनांचें व सवलतींचें दिग्दर्शन रजिस्ट्रार श्री. बी. एल. तांबे ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत केलें आहे.

---

### शहादें तालुक्यांतील "बचत–सप्ताह"

मे. रजिस्ट्रार साहेब को. सोसायटीज पुणें यांचे सर्क्युलरप्रमाणें शहादें तालुक्यांत "अधिक बचत सप्ताह" तारीख ७–१–४८ ते १३–१–४८ पर्यंत मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. सप्ताहाचा उद्घाटन समारंभ ता. ७–१–४८ रोजीं शहादे येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतींत तालुक्यांतील प्रमुख सहकारी कार्यकर्ते मे. डॉ. विश्राम हरि पाटील एम्. एस्सी.,' पीएच्. डी. यांचे अध्यक्षतेखालीं करण्यांत आला. त्यावेळीं तालुक्यांतील सोसायट्यांचे प्रतिनिधी व इतर सहकारी कार्यकर्ते मुद्दाम उपस्थित होते. सभेंत या भागचे ॲडि. डि.को. ऑफिसर मि. पाटील, बँकेचे इन्स्पेक्टर मि. देसाई, युनिअनचे सुपरवायझर मि. उत्तमराव पाटील व ह्या तालुक्याचे मामलेदार साहेब श्री. देवमानकर यांचीं प्रसंगास अनुसरून भाषणें झालीं.

---

### काँक्रीट कामांतील वाकबगार कंत्राटदारांची यादी

मुंबई सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटना योजनेंत अनेक पुलांच्या बांधणीचा समावेश आहे. हें काम लवकर व चांगलें व्हावें ह्यासाठीं सरकारनें काँक्रीट स्पेशॅलिस्ट कंत्राटदारांची, त्यांच्या कामें करण्याच्या पात्रतेप्रमाणें, यादी करण्याचें योजिलें आहे. (अ) २ लाख रुपयांपर्यंत, (ब) ५ लाख रुपयांपर्यंत व (क) ५ लाखावरचीं कामें करूं शकणाऱ्या कंत्राटदारांची वर्गवारी केली जाईल. ज्यांना आपलीं नांवें यादींत दाखल व्हावींत, असें वाटत असेल त्यांनीं १ एप्रिल १९४८ पूर्वीं सरकारकडे खालील माहिती पाठवावी :—

(१) नांव, (२) कोठें काम करण्याची तयारी, (३) आर्थिक परिस्थिति (४) सामान्य पंप, काँक्रिट मिक्सर वगैरे साहित्य आहे काय ? (५) पुलांसाठीं लागणारी खास यंत्रसामुग्री आहे काय ? (६) स्वतःचे नकाशे देऊं शकणारे इंजिनिअर्स पदरीं आहेत काय ?, (७) ह्यापूर्वीं पार पाडलेलीं आर. सी. सी. कामें.

---

नवीन पुष्कळ निघाले, तरी

**तुळजाराम मोदी,**

**सातारा**

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

## NOTICE

### The Presidency Industrial Bank Ltd.,
### POONA

Notice is hereby given that the Eleventh Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Sunday the 22nd February 1948, at the registered office of the Bank, at 4 p. m., to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet, and the report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1947.

2. To declare a Dividend.

3. To elect three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election. M/s. G. U. Chitale, G. R. Sathe and S. M. Joshi retire and offer themselves for re-election. Mr. M. M. Gadre and Mr. L. M. Joshi, co-opted Directors, also retire.

4. To appoint auditors and to fix their remuneration.

5. To transact any other business as may be allowed by the Chairman.

Poona City, 20-1-1948.

By order,
C. T. Chitale,
Managing Director.

### महाराष्ट्रांतील कांहीं औद्योगिक बातम्या

श्री. फळणीकर ( किर्लोस्कर बंधू लि. ) हे आपला इंग्लंड-अमेरिकेचा दौरा आटपून परत आले. शिकॅगो येथील महान मशिनरी प्रदर्शनाची त्यांनीं अभ्यासू दृष्टीनें पहाणी केली. शेठ गुलाबचंद हिराचंद ह्यांची डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनच्या चालू वर्षाच्या अध्यक्षपदीं निवड झाली आहे. डेक्कन इंजिनिअरिंग लि. माधवनगर, ह्या कारखान्यास फलटणच्या राजेसाहेबांनीं नुकतीच भेट दिली. ब्लॉसम मॅ. कं. लि. पाव, केक्स वगैरे खाद्य-पदार्थ आधुनिक पद्धतीनें करण्यास लवकरच प्रारंभ करतील. मेसर्स अनंत कला ह्यांनीं पुणें येथें ड्रॉईंग इन्स्ट्रुमेंट्स, बॉक्सेस, डिसेक्टिंग सेट्स, टाइपरायटर्स, स्टँड, इ. तयार करण्याचें हातीं घेतलें आहे. सुरस ग्रंथमाला, पंढरपूर ही तिचे मालक श्री. अरविंद व्होरा ह्यांच्या नेतृत्वाखालीं नव्या जोमानें प्रकाशन-कार्य हातीं घेणार आहे. हिंद विजय स्टोअर्स ह्या नांवानें मुंबईचे कापड व्यापारी मे. मावळंकर ब्रदर्स लि. व श्रीधर भालचंद्र आणि कं. ह्यांनीं एक नवें कापडाचें दुकान मुंबईंत प्रार्थना समाज नाक्यावर सुरू केलें आहे. सनेक्स फोटो स्टुडिओ, बेलबाग चौक, पुणें ह्यांनीं अस्सल रशियन प्रोसेसनीं नैसर्गिक रंगांत ऑईल पेंट चित्रें स्वस्त किंमतींत काढण्याचा यशस्वी उपक्रम पुण्यांत प्रथमच केला. ( पॅरेमाऊंट प. सिंडिकेट मार्फत )

### निर्वासितांना उद्योग-धंद्यासाठी कर्जें देणारी मध्यवर्ती संस्था

निर्वासितांच्या जीवनाचा प्रश्न सोडविण्यासाठी एक निम-सरकारी संस्था-रीहॅबिलिटेशन फिनॅन्स ॲडमिनिस्ट्रेशन-स्थापन करणारें एक बिल डोमिनिअन पार्लमेंटात मांडण्यांत आलें आहे. ह्या संस्थेस मध्यवर्ती सरकार १० कोटी रुपयांपर्यंत भांडवल पुरवील व तिचे-वर नियंत्रणहि सरकारचेंच राहील. निर्वासितांना धंदे उभारण्यासाठी ही संस्था रकमा कर्जाऊ देईल. कर्जाऊ रकमेनें निर्माण होणारी मालमत्ता संस्था तारण म्हणून लावून घेईल. संस्थेचे तज्ज्ञ तांत्रिक सल्लागार म्हणून श्री. चिं. गो. काळे ( मुंबईचे सेवानिवृत्त चीफ इंजिनिअर ) ह्यांची नेमणूक झाली आहे.

**कापडाचे उत्पादनावर पट्टी**—कापडावरील नियंत्रण रद्द झाल्यानंतर, किंमती ठरविण्याचा अधिकार गिरण्यांना देण्यांत आला आहे. ह्या नव्या किंमती भरमसाट न होता योग्य मर्यादेंत रहाव्यात, असें हिंदुस्थान सरकार व गिरणीमालक संघ ह्यांचेमधील चर्चेंत ठरलें आहे. कापडाच्या नव्या व जुन्या किंमतीमधील कांहीं तफावत सरकार मध्यवर्ती तिजोरीसाठीं, कापडाच्या उत्पादनावर पट्टी बसवून, वसूल करणार आहे. तिचें उत्पन्न २ कोटी रुपये होईल.

**पोलादासाठी अर्ज करूं नका**—पोलादाच्या पुरवठ्याची परिस्थिति फारच असमाधानकारक झाली आहे. तेव्हां, घरांच्या कॉंक्रीट कामासाठी पोलादाच्या मागणीचे अर्ज ह्यापुढें सरकारकडे पाठविण्यांत येऊं नयेत असें प्रांतिक सरकारनें जाहीर केलें आहे. १५ जानेवारी, १९४८ नंतरचे सर्व अर्ज अर्जदारांकडे परत धाडण्यांत येतील, कारण त्यांचा आणखी सहा महिने तरी विचार होऊं शकणार नाहीं. पुनः अर्ज स्वीकारण्यास केव्हां प्रारंभ होईल, हें प्रसिद्ध केलें जाईल.

**सहकारी फळ बागा**—पूर्व पंजाबमध्यें सहकारी तत्वावर फळबागा लावण्यासाठीं सरकारनें एक योजना मंजूर केली आहे. मुसलमानांनीं खालीं केलेल्या जमिनींपैकीं ५०० ते १५,००० एकर जमीन प्रत्येक जिल्ह्यांतून ह्यासाठीं निवडण्यांत येणार आहे.


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | २०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | २८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील. B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले. M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा. B. Com., C. A. I. I. B.



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक. लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ) ● स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५१

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | २०,१४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १५,६५,००० रु. |

**खेळतें भांडवल ७ कोटी रुपयांवर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग्ज बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## मालवीय पुलाचा इतिहास

**१९२५ सालीं योजनेस प्रारंभ : २३ वर्षांनीं अर्धें काम पुरें**

काशी येथील गंगेवरील पुलाचें उद्‌घाटन गेल्या महिन्यांत झालें. ह्या ठिकाणचा पहिला पूल १८८५ मध्यें बांधण्यांत आला, त्यावर एक रेल्वे लाइन व गाडी रस्ता ह्यांस जागा होती. गाडी रस्त्याचा उपयोग फक्त पावसाळ्यांतच केला जाई. वहातुकींत वाढ होत गेली, तसतशी पुलावरून रोज जाणाऱ्या आगगाड्यांची संख्याहि वाढत चालली. १८८५ सालीं १० ते १२ आगगाड्या रोज जात; १९२५ मध्यें त्यांची संख्या ३० वर गेली. आतां ती ५० झाली आहे. गाडीरस्त्यावरील वाढत्या वहातुकीचे आकडे उपलब्ध नाहींत. १९२० सालींच मोठा पूल बांधण्याची भाषा सुरू झाली. जुन्या पुलाचें पोलादी काम फार काळ टिकणार नाहीं असें आढळून आल्याकारणानें नव्या पुलाच्या योजनेस चालना मिळाली. १९२५ सालीं पूल कशा प्रकारचा बांधावा ह्याविषयीं चौकशीस प्रारंभ झाला. १९३५ मध्यें अखेर ठरलें कीं, जुन्या पुलाचे जागीं आगगाड्या व मोटारी ह्या दोघांचीहि वहातुक करणारा मोठा पूल बांधावा. १९४० अखेर पूर्व तयारी झाली. गर्डर्स मिळणें अशक्य झाल्यामुळें १९४१ मध्यें काम स्थगित करणें भाग पडलें, तें युद्ध संपेपर्यंत चालू करतां आलें नाहीं. १९४५ अखेर पोलादाचें सामान जमवून जुन्या पुलाच्या बांधकामांत आवश्यक ते फेरफार करण्यास प्रारंभ झाला. पुलावरून रेल्वेची सिंगल लाईन सप्टेंबर १९४७ मध्यें सुरू झाली; डबल लाईनला प्रारंभ गेल्या महिन्यांत झाला. पुलास एकूण ७८ लक्ष रुपये खर्च येईल असा मूळ अंदाज होता, त्यापैकीं ५३ लक्ष रुपये रेल्वेपुलासाठींच होते. ह्या रेल्वेपुलाचें काम ४८ लाखांतच पुरें झालें आहे, कारण जुन्या गर्डर्सच्या विक्रीपासून अपेक्षेपेक्षां जास्त उत्पन्न झालें. पुलाची उभारणी श्री. गणपती ह्यांच्या नेतृत्वाखालीं झाली. पुलावरील रस्त्याचें काम आवश्यक तो माल मिळताच तात्काळ हातीं घेऊन पुरें केलें जाईल. जुन्या पुलाचें नांव डफरिन पूल असें होतें, तें आतां मालवीय पूल असें ठेवण्यांत आलें आहे.


### तांदूळ

दुसऱ्या महायुद्धापूर्वी युरोपांत इतर देशांकडून १२ लक्ष टन तांदुळाची दरसाल आयात होत असे. ती पूर्णपणें बंद ठेवण्यांत आली होती; १९४६ मध्यें फक्त ५ हजार टन तांदूळ युरोपला देण्यांत आला. १९४८ च्या पहिल्या सहामाहींत युरोपला ६१ हजार टन तांदूळ मिळणार आहे. त्यापैकीं ग्रेट ब्रिटन २५ हजार टन घेणार आहे आणि फ्रान्सच्या वाट्यास १० हजार टन तांदूळ येईल. आशियांतील तांदळाचें उत्पादन फारच मंद गतीनें वाढत आहे. त्यामुळें त्याची निर्गत करण्याची पात्रताही फार हळु हळु सुधारत आहे. ब्रह्मदेशांतून मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणावर तांदूळ निर्गत होऊं लागला आहे.

### शनिवार-वाड्याचा सदुपयोग

शनिवार-वाड्याचा अधिक सदुपयोग कसा करतां येईल या बाबत शिफारशी करणेंकरितां मुंबई प्रांतिक सरकारनें एक समिति नेमलेली आहे. या संबंधांत पुणें नगरपालिकेनें एक ठराव संमत करून लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय व महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालय या संस्थांसाठी ह्या वाड्यांत इमारती बांधल्या जाव्यात, ह्या योजनेस पाठिंबा दिला आहे. लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें, या संस्थेस आजवर पुणें नगरपालिकेनें अनेक प्रकारें सहाय्य केलें आहे व पुढेंहि या संस्थेच्या संवर्धनाच्या योजनांच्यामध्यें पुणें नगरपालिका सहाय्यभूत होत राहील, असेंहि आश्वासन वरील ठरावानें दिलें आहे.


**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



**शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.**


१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८







**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

वर्ष १४ **अर्थ** अंक ६

पुरवणी

पुणें, बुधवार, ता. ११ फेब्रुवारी, १९४८

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट

व

महाराष्ट्र विभाग सहकारी स्कूलबोर्ड

ह्यांचे विद्यमानें

# महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें.

शनिवार, ता. १७ व रविवार, ता. १८ जानेवारी १९४८

परिषदेचे स्वागताध्यक्ष

## श्री. य. द. खोले ह्यांचें भाषण

प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन

## सर जनार्दन मदन ह्यांचें भाषण

परिषदेचे अध्यक्ष

## प्रिं. ध. रा. गाडगीळ ह्यांचें भाषण

## परिषदेंत मंजूर झालेले ठराव

संस्थापक
प्रो. वा. गो. काळे ] अर्थ [ संपादक
श्रीपाद वामन काळे
ता. ११ फेब्रुवारी, १९४८ च्या अंकाची पुरवणी

# यशस्वी सहकारी परिषद

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट व महाराष्ट्र विभाग सहकारी स्कूल बोर्ड ह्यांचे विद्यमानें पुणें येथें ता. १७ व १८ जानेवारी रोजीं महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद् भरविण्यांत आली होती. हिंदुस्थान सरकारचे मंत्री श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं समयोचित भाषण करून परिषदेचें उद्घाटन केल्यानंतर परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. य. द. खोले ह्यांनीं स्वागतपर भाषण केलें. त्यांत त्यांनीं महाराष्ट्रांतील सात जिल्ह्यांतील सहकारी चळवळींचा थोडक्यांत आढावा घेऊन गाडगीळ समिति, सरैय्या समिति व नाणावटी समिति ह्यांच्या अहवालांतून निष्पन्न होणाऱ्या निकडीच्या प्रश्नांचें दिग्दर्शन केलें. प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन, सर जनार्दन मद्न, ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीबाबत कार्यकर्त्यांच्या मनांत वावरणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा उल्लेख केला. अध्यक्षांनीं आपल्या विस्तृत भाषणांत, सध्याच्या सामाजिक परिवर्तनामधील सहकारी चळवळीच्या स्थानाचें उत्कृष्ट विवेचन केलें आणि शेतकऱ्यांचें दारिद्र्य दूर होण्याचे दृष्टीनें सरकारी धोरणांत कोणते महत्त्वाचे बदल होणें अगत्याचें आहे, हें सुस्पष्ट करून सांगितलें.

परिषदेनें औद्योगिक, शेतकी, नागरी, हौसिंग, मार्केटिंग आणि सर्वसाधारण व लँड मॉर्गेज बँक अशा सात विभागांत मिळून एकूण ४८ ठराव मंजूर केले. त्यांपैकीं (१) ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन व (२) जिल्हा यूनियन बोर्ड आणि तालुका सुपरवायझिंग बोर्ड ह्यांचें अधिकारक्षेत्र, ह्या विषयींच्या ठरावांवर विशेष चर्चा झाली. ॲ. के. कॉर्पोरेशनचें काम ह्या प्रांतांतील सहकारी चळवळीनें हातीं घ्यावें, असें परिषदेचें मत पडलें. ह्या विषयाचें महत्त्व लक्षांत घेतां, परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांत हा ठराव अत्यंत दूरगामी परिणामकारक असा आहे, हें उघड आहे. मुंबई प्रां. सहकारी परिषद् मुंबई येथें एप्रिल, १९४८ मध्यें सर व्ही. टी. कृष्णमाचारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार असल्याचें निश्चित झालें आहे. त्या परिषदेंत ह्या विषयावर आणखी चर्चा होईलच.

परिषदेंतील भाषणें व ठराव, हीं सर्वच सहकारी चळवळीच्या सध्याच्या संक्रमण काळावर उत्कृष्ट प्रकाश पाडणारीं असल्यानें, तीं एकत्रित करून पुरवणी रूपानें "अर्था"च्या वाचकांस देण्याचें आम्हीं योजिलें. ह्या उपक्रमाचें स्वागत करून प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट व प्रांतिक आणि जिल्हा बँका ह्यांनीं सक्रिय पाठिंबा देऊन परिषदेच्या कार्याच्या प्रसारास सहाय्य केलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

# महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें.

### स्वागताध्यक्ष

## श्री. य. द. खोले, ह्यांचें भाषण

प्राचार्य धनंजयराव गाडगीळ, सहकारी बांधव,

महाराष्ट्र सहकारी परिषदेस आपण आमच्या निमंत्रणास मान देऊन उपस्थित झालांत त्याबद्दल मी मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट, महाराष्ट्र विभाग स्कूलबोर्ड व स्थानिक परिषद् समिति या सर्वांतर्फे आपलें मनःपूर्वक स्वागत करतों. आमच्या पुणें शहरांत अद्याप नियंत्रित वाटप पद्धति अस्तित्वांत असल्यामुळें आपलें स्वागत केवळ शब्दानें करावे लागत आहे याची जाणीव परिषद् चालकांस आहे. आपण सर्वजण प्रवास व इतर अडचणी सोसून परिषदेस सहकारी चळवळीवरील प्रेमामुळें उपस्थित झाला त्याबद्दल पुनः एकवार आपले आभार मानतों व मनःपूर्वक स्वागत करतों.

महाराष्ट्र विभाग परिषद् आज सुमारें १२ वर्षांनी भरविण्यांत येत आहे. माझे आठवणीप्रमाणें ही परिषद् सन १९३५ सालीं सातारा येथें झाली व पुढें सहकारी प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या जिल्हा व विभाग शाखा बंद झाल्यानें व प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या घटनेमध्यें महत्त्वाचे असे फरक झाल्यानें जिल्हा अगर विभागाकरितां प्रचाराचें असें साधन राहिलें नाहीं. जिल्हा सुपरवायझिंग युनिअनला जोडून जरी एज्युकेशन कमिटी अस्तित्वांत आली तरी त्या समितीकडे योग्य असा नोकरवर्ग अगर आर्थिक व्यवस्था नसल्यानें अशा परिषदा होऊं शकल्या नाहींत. सन १९४६ सालीं मुंबई सरकारनें सर जनार्दन मदन यांचे अध्यक्षतेखालीं एक सहकारी शिक्षणाचा विचार करण्यासाठीं समिति नेमली व या समितीनें ज्या शिफारशी केल्या आहेत त्यामध्यें सहकारी चळवळीचा शिक्षणद्वारें व परिषदांमार्फत प्रचार करण्याच्या धोरणास मान्यता दिली आहे. जिल्हा सहकारी परिषद् जिल्हा सुपरवायझिंग युनिअनला बोलावणें शक्य आहे, परंतु विभाग परिषद् बोलावण्यांत अनेक अडचणी

असल्यामुळें केवळ मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे विनंतीवरून ही परिषद् महाराष्ट्र विभाग स्कूल बोर्डानें पुणें येथील स्थानिक सहकारी संस्था व सहकारी कार्यकर्ते यांचे अनुमतीनें बोलाविली आहे. अशा विभाग परिषदा आपल्या प्रांतांत दुसऱ्या ठिकाणीं होणार आहेत. आपणा सर्वांप्रमाणें माझीही अशी इच्छा आहे कीं जिल्हा व विभाग सहकारी परिषदा वारंवार होण्याची व्यवस्था होणें जरूर आहे.

या विभाग परिषदेच्या निमित्तानें सहकारी चळवळीचा थोडक्यांत आढावा घेणें जरूर असल्यानें तसें मी करण्याचें ठरविलें आहे. ही परिषद् पुणें जिल्ह्यांत होत असल्यानें प्रथम या जिल्ह्यापुरती मी आपणास माहिती देत आहे. पुणें जिल्ह्यासाठीं मध्यवर्ती सहकारी बँक, लँड मार्टगेज बँक, पुणें जिल्हा सुपरवायझिंग युनिअन, पुणें जिल्हा खरेदी विक्री संघ, अशा जिल्हा मध्यवर्ती संस्था असून अर्बन बँका ८, खरेदी विक्री तालुका संघ ३, प्रोडयूसर्स सोसायट्या ७, हाउसिंग सोसायट्या १२, कन्झूमर्स सोसायट्या सुमारें २५ आहेत व शेतकी पतपेढ्या ३२८. या शेतकी सहकारी संस्थांत एकूण सभासद् संख्या २४,२४९ असून भागांचें भांडवल सुमारें रु. ३,९८,७५७ आहे व गंगाजळी धरून एकूण खेळतें भांडवल रु. २५,१७,७२९ आहे.

आज आपली परिषद् ७ जिल्ह्यांची भरत आहे. त्या जिल्ह्यांची सोसायट्यांची संख्या पुढीलप्रमाणें आहे :

| प्रकार | पूर्व खा. | पश्चिम खा. | नाशिक | नगर | पुणें | सोलापूर | सातारा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेतकी अनियमित | ६५९ | ४११ | ३१७ | २८६ | २८७ | २८५ | ४२३ | २६६८ |
| „ नियमित | ६ | ५ | २३ | २० | १३ | ७ | २१ | ११५ |
| परचेस सेल लि. | २३ | ४६ | १६ | ५ | ३ | २ | ४ | १०३ |
| प्रोडयूसर्स अन. लि. | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | २ |
| „ लिमिटेड | ३४ | १३ | ० | ७ | ६ | ५ | १० | ७५ |
| इतर | १७ | ८ | १३ | १९ | १८ | ९ | ४६ | १३० |
| बेटर फार्मिंग | ० | ५ | ३ | ० | ० | ० | ० | ८ |
| एकूण | ७३९ | ४८९ | ३७२ | ३३७ | ३२८ | ३१२ | ५२४ | ३१०१ |

सन १९४२–४३ सालीं मुंबई इलाख्यांत एकंदर ग्रामीण सहकारी सोसायट्यांची संख्या ३८९८ होती. तीच संख्या १९४५ सालीं ४७९६ झाली. सन १९४२–४३ सालीं खेळतें भांडवल ( शेतकी पतपेढ्यांचें ) रु. २,५५,०४,२४२ होतें व सन १९४५–४६ सालीं खेळतें भांडवल ३,०६,८२४०९ होतें.

यावरून आपणास असें दिसून येतें कीं दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर सहकारी चळवळीची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली व तिचें कार्यक्षेत्रही व्यापक असें झालें.

दुसऱ्या महायुद्धामुळें देशाच्या जीवनांत फार मोठी क्रांति झाली. जीवनोपयोगी अशा अवश्यक वस्तूंचें नियंत्रण व वांटप सरकारास करणें क्रमप्राप्त झालें व या कामीं सरकारास व जनतेस सहकारी चळवळीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याची बुद्धि झाली. प्रथम असें काम सहकारी शेतकी पतपेढ्यांनीं घ्यावें किंवा नाहीं याबद्दल तात्विक वाद झाला व असाहि आक्षेप घेण्यांत आला कीं, नियंत्रित वांटपाचें काम सोसायट्यांनीं घेतल्यास त्या सोसायट्यास त्यांच्या नेहमींच्या कामाकडे दुर्लक्ष करावें लागेल. परंतु नियंत्रणामुळें जर जास्तींत जास्त कोणास त्रास झाला असेल किंवा होण्याची शक्यता होती तर ती ग्रामीण जनतेस असल्यानें हें काम सहकारी सोसायट्यांनीं घ्यावें असें वाटलेवरून तें काम घेण्याचें ठरलें. या कामीं प्रथम प्रथम सरकारी अधिकाऱ्यांची सहानुभूति नसल्यानें बऱ्याच अडचणी आल्या व शिवाय आपले सहकारी चळवळींतील कार्यक्षम अशा नोकरांचे अभावी कांहीं दोषही पत्करावे लागले परंतु पुढें लोकमतानुवर्ती अशी प्रांतिक मंत्रिमंडळें स्थापन झाल्यानें या प्रश्नास जोराची चालना मिळून हें काम सुरळीतपणें चालू झालें. या कामाचा मोठा फायदा असा झाला कीं सोसायट्यांचा ग्रामीण जनतेशीं निकट संबंध येऊन त्यांच्या जीवनविषयक अडचणी दूर करण्याची संधि मिळून शिवाय थोडेफार व्यवहारी असें व्यापारी शिक्षणही मिळालें व शेतकऱ्यास लागणारा सर्व माल शक्य तर सहकारी संस्थेमार्फत पुरवला जाण्याची आग्रहपूर्वक मागणी जनतेकडूनच येऊं लागली. या सर्व कामांत सरकार व सहकारी खातें यांचें सुसंबद्ध असें धोरण राहिलें असतें तर याहीपेक्षां जास्त असें कार्य करतां आलें असतें. आज नियंत्रण व योजना त्याचप्रमाणें देशांतील उत्पन्न होणारा माल यांच्या किंमतीबद्दल योग्य असें नियंत्रण नसल्यामुळें देशाच्या आर्थिक परिस्थितीची केवढी चलबिचल होऊं पाहात आहे व याचा परिणाम मुख्यत: जर कोणास त्रासदायक व्हावयाचा असेल तर तो ग्रामीण विभागाच्या जनतेस व्हावयाचा आहे हें विसरून चालणार नाहीं. नियंत्रणाच्या अनेक दोषांमुळें व कांहीं विषम अशा पदार्थांच्या वांटप–पद्धतीमुळें जनता जरी नियंत्रणास कंटाळली होती, तरी स्वतंत्र हिंदी राज्य म्हणून आपणांवर ज्या जबाबदाऱ्या पडणार आहेत त्या पार पाडण्यासाठीं आर्थिक नियोजनेचा निश्चित असा कार्यक्रम असणें जरूर आहे असें वाटतें. सहकारी चळवळींच्या गेल्या पांच वर्षांतील प्रगतीचें मापन मुख्यत: संस्थेच्या संख्येंत वाढ, ठेवीमधील आश्चर्यकारक वाढ व नवीन नवीन क्षेत्रांत प्रवेश यामुळें करतां येईल; परंतु यापुढें सहकारी चळवळींत समाविष्ट होणारी जनता केवळ सहकारी चळवळीवरील विश्वास म्हणून होणार नसून केवळ चळवळ हें आपलें उद्दिष्ट गांठण्यासाठीं साधन आहे असें समजून येईल अशी साधार भीति वाटूं लागली असून अशा आक्रमणापासून आपण सावध राहणें जरूर आहे अशी सूचना देणें क्रमप्राप्त आहे,

युद्धांत्तर पुनर्रचनेंत ज्या अनेक विषयासंबंधीं विचार चालूं आहे त्यामध्यें मुख्यत: शेतकरी कर्जनिवारण, शेतकी पतीची पुनर्घटना व सहकारी चळवळीचें नियोजन यांचा समावेश होतो व यासाठीं हिंदुस्थान सरकारनें दोन समित्या नेमल्या होत्या. पैकीं एक समितीचे म्हणजे शेतकी पतीची पुनर्घटना; या समितीचे अध्यक्ष म्हणून आजचे आपले सन्माननीय अध्यक्ष यांची नेमणूक झाली होती. दुसऱ्या समितीचें अध्यक्षस्थान आपल्या सहकारी प्रांतिक बँकेचे लोकप्रिय अध्यक्ष श्री. सरय्या होते. शेतकरी कर्जनिवारणाबाबत प्रांतिक सरकारनें निरनिराळे कायदे केले आहेत व त्याचबरोबर शेतकऱ्यांना नियंत्रित दरानें कर्ज मिळावें म्हणूनही कायदे केले आहेत.

गाडगीळ समितीचा अहवाल उशीरा कां होईना सरकारनें मंजूर केला व त्या अहवालासंबंधीं आपल्या प्रांताच्या सरकारनें विलंब न लावतां त्यांच्या शिफारशी-प्रमाणें एक समिति नेमली. त्यासंबंधीं जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचें मत मागविलें व त्यांच्या शिफारशीप्रमाणें एक समिति नेमली. गाडगीळ समितीची शेतकी पुनर्घटनेसंबंधीं मुख्य शिफारस अशी कीं, जर शेतकऱ्यास आपले शेतकीविषयक व्यवसाय किफायतशीर व त्यास जीवन कंठण्याचे दृष्टीनें चालवावयाचे असतील तर त्याबाबत पुढील गोष्टी तावडतोब अंमलांत आणणें आवश्यक आहे. (१) शेतकऱ्याचें कर्ज त्याचे परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें कमी व्हावें. ( २ ) कर्ज कमी करावयाचें काम शक्य तितक्या तातडीनें होऊन तें न्यायदानांच्या कामाची माहिती असलेल्या अधिकाऱ्याकडून व्हावें. ( ३ ) नवीन मिळणारें कर्ज त्यास सुलभ रीतीनें व कमी व्याजानें त्याच्या परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें मिळावें व त्याची फेडीची ऐपत वाढावी म्हणून उत्पादन वाढावें अशी व्यवस्था व्हावी व यासाठीं सरकारी नियमित असा पैसा पुरवणारी प्रांतिक संस्था अस्तित्वांत यावी व ज्या ठिकाणीं सहकारी चळवळ उच्च दर्जाला पोंहोचली असेल तेथें हें कर्ज पुरविण्याचें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावयास हरकत नाहीं असें मत व्यक्त केलें. वरील शिफारशींचा विचार वर सांगित-ल्याप्रमाणें मध्यवर्ती जिल्हा बँकेच्या प्रतिनिधींच्या सभेंत झाला व त्यांनीं विचार करून मुंबई इलाख्यांत हें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावें असा अभिप्राय सरकारकडे व्यक्त केला व तपशीलवार विचार करण्यासाठीं सर मणिलाल नानावटी यांचे अध्यक्षते-खालीं एक समिति सरकारनें नेमावी. या समितीनें आपला अहवाल तयार करून हें काम सहकारी संस्थामार्फत व्हावयास हरकत नाहीं असें मत नमूद केलें असून या बाबत याचा सरकार दरबारी विचार सुरु झाला आहे. नानावटी समितीनें हें काम सहकारी संस्था-मार्फत व्हावयाचें ठरल्यास सरकार ज्या सवलती सरकारनियंत्रित अशा पैसे पुरविणाऱ्या संस्थेस देऊं करणार होती, त्याच सवलती सहकारी संस्थेस दिल्या जाव्यात असें नमूद

केलें आहे. आजवर सहकारी चळवळीच्या अयशस्वितेचीं कारणें शोधल्यास असें दिसून येईल कीं, सोसायट्या आर्थिक दृष्ट्या कमी फायद्याच्या अशा सभासदांच्या होत्या व त्यामुळें सहकारी संस्थेनें किती जरी श्रम केले तरी ते व्यर्थ झाले. आतां जरी पतवाल्या शेतकऱ्यांना कर्ज सहकारी संस्था पुरवूं शकली, तरी ती व्यवस्था किती काळ यशस्वी होईल हा विचाराचा प्रश्न आहे. खुद्द नानावटी समितीनें आपल्या अहवालाच्या पृष्ठ क्रमांक ४५, प्यारा ( ३ ) मध्यें पुढील विचार नमूद केले आहेत:—

"Looking to the past history of, the co-operative movement and its present development, this appears to be a difficult undertaking. These are certain limitations inherent in the co-operative movement. It cannot expand mechanically. It is a human movement both in its application and in its administration and must develop gradually and methodically, if past experience have any value."

नानावटी समितीनें आपल्या अहवालांत असें नमूद केलें आहे कीं ३० जून सन १९४६ अखेर मुंबई प्रांतांत शेतकी पतपेढ्या एकूण ४५३२ होत्या. सोसायट्यांचे सभासद एकूण २,११,२५७ होते व २९४ विविध कार्यकारी सोसायट्या होत्या व त्यांचे सभासद २०९५५ होते. सहकारी पतपेढ्यां ज्या खेडेगांवांत काम करीत होत्या अशा गांवाची संख्या ५९४२ होती व एकंदर इलाख्यांत खेडेगांवाची संख्या २१७४२ आहे यावरून सहकारी चळवळीचा प्रचार एकूण शेंकडा २७ गांवांत झाला आहे. सहकारी सोसायट्यामार्फत ज्या ग्रामिण जनतेच्या गरजा पुरविल्या जातात त्या शेंकडा ७·५ इतक्या ग्रामीण जनतेस पुरविल्या जातात. एकंदर शेतकी पतपेढींच्या खेळत्या भांडवलापैकीं ५८·९ टक्के भांडवल शेतकी सोसायट्यांचें स्वतःचें आहे. सहकारी चळवळीचा प्रसार आपल्या प्रांतांत सर्वत्र व्हावा अशी आपणा सर्वांची केव्हांही इच्छा असणारच; परंतु ही जबाबदारी स्वीकारतांना आपली मर्यादा, मागील अनुभव लक्षांत घेऊनच घ्यावी लागेल. नानावटी समितीनें हें काम सहकारी चळवळीकडे देण्याची शिफारस करतांना ज्या मुख्य मुद्यांवर भर दिला आहे तो मुद्दा असा कीं, सहकारी चळवळीनें आज जो खेड्या-पाड्यांत प्रसार केला आहे तसा दुसरा कोणत्याही संस्थेनें केला नाहीं. शिवाय आज-पर्यंत शेतकरी लोकांना कर्ज देण्यांत त्यांचा अनुभव उपयोगी येईल, व दुसऱ्या कोण-त्याही संस्थेनें हें काम अंगावर घेतल्यास अपेक्षेप्रमाणें सर्वांच्या गरजा भागविणें शक्य होणार नाहीं. सहकारी संस्थांकडे भांडवलही बरेंचसें असल्यानें त्यास वाव मिळून कर्ज ग्रामिण जनतेस मिळूं शकेल. यासाठीं सहकारी प्रांतिक बँक यांची घटना व अधिकार यांमध्यें महत्त्वाचे असे फरक सुचविले आहेत. त्याचप्रमाणें सोसायट्यावरील देखरेख, कर्जाचे व्याजाचा दर याबाबतही त्यांनीं सूचना

केल्या आहेत. गाडगीळ समितीची सरकारनियमित अशा कर्ज देण्याचे बाबत मुख्य शिफारस त्यांनीं आपल्या अहवालाच्या पृष्ठ क्रमांक ८२, शिफारस क्रमांक २१ मध्यें पुढीलप्रमाणें केली आहे.

'The existing co-operative banking organisations cannot be utilized as the alternative agency of credit, because they are not equally strong in all provinces and also because they are essentially autonomous bodies ruled largely by their own members; further problems might arise in linking the co-operative banking structure with Non-members.'

पुढें आपल्या शिफारसक्रमांक २३ मध्यें गाडगीळ समिति आपल्या अहवालांत असें म्हणत आहे कीं,

It would be better, at least in the initially, for each provinces to have a separate corporation which should possess centralized organization with a net work of local and sub-agencies.'

सहकारी कार्यकर्त्यांना असें प्रामाणिकपणें वाटतें कीं, गाडगीळ समितीनें सूचविल्याप्रमाणें सरकारनियमित अशी कर्ज देणारी संस्था निघाल्यास सहकारी चळवळ नामशेष होईल व यासाठींच व क्रमप्राप्त म्हणून ग्रामीण जनतेस लागणारा पैसा सहकारी चळवळीचे मार्फत पुरविला जावा. याबाबत गाडगीळ समितीची शिफारस पुढीलप्रमाणें आहे.

In province in which Govt. feels that the co-operative financial agencies are so strong and have such wide scope that men could undertake all work which we have indicated as in the sphere of the Agricultural Credit Corporation there would be no objection if a separate corporation is not set up provided that means are found for making finance through co-operatives available to all credit-worthy borrowers.'

गाडगीळ समितीनें आपल्या शिफारशी फार काळजीपूर्वक केल्या असून त्यांतील प्रत्येक शिफारशीवरील निर्णय घेतांना फार दक्षता घ्यावयास पाहिजे. सहकारी चळवळीकडे काम घेतांना त्या खरोखर संबीर आहेत किंवा नाहीं व त्याप्रमाणें, त्यांची स्वायत्तता नवीन व्यवस्थेंत राहून शिवाय त्या आपलें शुद्ध स्वरूप ठेवूं शकतील किंवा नाहीं याचा विचार व्हावयास पाहिजे. खुद्द नानावटी समितीसही सहकारी चळवळीच्या मर्यादा, पूर्वानुभव व त्यांची मनुष्यनिर्मित चालना या बद्दल थोडीफार साशंकता आहे असें दिसतें. तेव्हां या परिषदेंत हा महत्त्वाचा विचार होणें अवश्य आहे असें वाटतें. सरकारनियमित अशी कर्ज देणारी संस्था स्थापन होऊन कांहीं वर्षें त्यांनीं

ज्या ग्रामीण जनतेस सहकारी चळवळीमार्फत लागणारी आर्थिक मदत मिळत नाहीं त्यांना सहकारी चळवळीचे मार्फत त्या संस्थांचे मध्यस्थ म्हणून कांहीं वर्षे काम करून अनुभवानें याबाबतची योजना आंखणें इष्ट होईल किंवा काय याचा विचार करावा. सुदैवानें या प्रश्नाचा दूरगामी विचार करून योग्य असें मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आजचे अध्यक्षांवर आहे व ते तसें मार्गदर्शन करतील असा माझा भरंवसा आहे.

आपलें प्रांतिक सरकार आज खरोखर श्रमजीवी लोकांचे हितासाठीं झटत आहे व त्यासाठीं त्यांनीं अनेक कायदे विधिमंडळांत पसार करून घेतले आहेत, परंतु केवळ कायदे करून उद्दिष्ट साधणें कठीण होत असल्याचें व्यवहारावरून दिसत आहे, आणि त्याचें उदाहरण म्हणजे कर्जनिवारण व सावकारी नियंत्रण कायदा हे होय. कर्जनिवारण कायद्याप्रमाणें कर्जाचे व्यवहाराबाबत अर्ज होऊन नवीन कर्ज मिळण्यास अडचणी वाटूं लागल्या आहेत. पीक कर्ज अपुरें असें वाटत असून त्यास मागणीहि अपेक्षेप्रमाणें कमी आहे. सावकारी नियंत्रण कायदा केला परंतु त्याची अंमलबजावणी करण्याचें ठरल्याबरोबर, दुसरी पैसा पुरवणारी संस्था आस्तित्वांत नसल्यानें गरजू लोकांचे फार हाल होऊं लागले आहेत. खरोखर ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विचार होऊन त्याबाबतची उपाय योजना तात्काळ अंमलांत आणल्यासच त्याचा उपयोग होईल, एरवी होणार नाहीं असें वाटतें.

प्रांतिक सरकार लवकरच सहकारी कायद्यांत सुधारणा करण्याचा विचार करीत आहे असें समजतें व त्यामध्यें बऱ्याच बाबींचा विचार व्हावयाचा आहे. सहकारी शेतकी पतपेढी मर्यादित जबाबदारीची असावी किंवा अनियमित जबाबदारीची असावी व सोसायटीचा सभासद होतांना सभासदांच्या जिंदगीपैकीं किती भागावर सोसायटीचा बोजा रहावा यासंबंधीं खुलासे करावयाचे असून यांची नोंद सरकारी दप्तरीं रहावयाची आहे. आपलेकडील शेतकी सोसायट्यांची परिस्थिति लक्षांत घेतां स्थानिक भांडवल फारसें उत्साहानें जमत नाहीं व त्यामुळें अनियमित जबाबदारीच्या सोसायट्यांची प्रथा पडली. अनियमित जबाबदारीमुळें मोठे शेतकरी या चळवळींत आले नाहींत असा आरोप घेतला जात आहे. त्याकरितां नियमित जबाबदारीच्या संस्था अस्तित्वांत याव्या अशी एक मागणी फार दिवसांपासून आहे. या सोसायट्यांना लागणारें भांडवल जर स्थानिक रूपानें जमणें शक्य असेल तरच नियमित जबाबदारीच्या संस्था चालूं शकतील; नाहीं तर भांडवलाच्या अभावीं शेतकी पतपेढीची फार अडचण होईल. दुसरा मुद्दा म्हणजे सभासदांच्या जिंदगीवर, तो कर्जदार असो किंवा नसो तो जी जिंदगी सांगेल त्यावर, संस्थेचा "बोजा" ठेवावयाचा अशी तरतूद होऊं पहात आहे. हें जर खरें असेल तर तें केव्हांही सहकारी मूलभूत तत्त्वाविरुद्ध होईल व

अशानें सहाजिकच सहकारी चळवळीचा प्रसार थंडावेल अशी साधार भीति वाटत आहे. दुसरी एक महत्त्वाची योजना या नवीन कायद्यान्वयें होऊं पहात आहे ती ही कीं एका संस्थेचे दोन विभाग करण्याची परवानगी कांहीं विशिष्ट परिस्थितींत देण्यांत यावयाची आहे. दुर्दैवाची गोष्ट कीं सहकारी चळवळींत सध्यांच इतके मतभेद व भांडणें आहेत कीं त्यांमध्यें या नवीन वादाचा प्रवेश कां व्हावा हें कळत नाहीं. एकादी संस्था मर्यादेपेक्षां जास्त मोठी झाली आहे, किंवा आपल्या सभासदांच्या गरजा भागविण्यास असमर्थ आहे, एवढ्यापुरती सोसायटीची विभागणी फारतर न्याय्य समजतां येइल. परंतु जर कां एकदा अशी विभागणी कायद्यानें सुलभ करून ठेवली तर सध्यांची खेडेगांवांची परिस्थिति लक्षांत घेतां, अशा विभागण्या मोठ्या प्रमाणावर झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

सहकारी चळवळीबाबतही असेंच म्हणता येईल. सहकारी चळवळीबाबत विचारपूर्वक योजना आखुन ठराविक कालमर्यादेंत त्याची अंमलबजावणी होण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे. सरकारनें आपलें धोरण निश्चित असें केलें नसल्यानें सहकारी कार्यकर्त्यांत किती असंतोष होतो याचें उदाहरण म्हणजे जिल्हा सुपरवायझिंग युनिअनचा प्रश्न होय. असलेले अधिकार काढून घेऊन सुपरवायझर सरकारी नोकर करण्यांत आले व युनिअन्सची घटना नवीन तयार करण्यांत आली. ही घटना स्वीकारण्याची चालना दिली जात असतां आतां नानावटी समितीनें या बाबत नविनच योजना स्वीकारली आहे. या अशा धोरणानें सहकारी चळवळ कशी यशस्वी होईल याचा सरकारनें विचार करावा असें आग्रहपूर्वक सुचवावेसें वाटतें.

सहकारी चळवळीची गेल्या ५।१० वर्षांत जी अनेक प्रकारांनीं प्रगति झाली त्यामध्यें खरेदी विक्री संघ, ग्राहक संघ, हाऊसिंग सोसायट्या यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे, परंतु या संस्थांच्या अनेक अडचणी असून त्याकडे ज्या प्रमाणांत लक्ष जावयास पाहिजे त्या प्रमाणांत न दिल्यानें या संस्थांची प्रगति समाधानकारक नाहीं. सहकारी खात्यानें कित्येक वेळां ज्या जरूरीच्या प्रश्नाकडे अगर अशा संस्थांच्या कारभाराकडे लक्ष द्यावयास पाहिजे तितकें दिलें न गेल्यानें अशा सहकारी संस्थांचे कार्यकर्त्यांत निराशा उत्पन्न होते. तेव्हां यासाठीं सहकारी खात्यानें तत्परतेनें लक्ष घालून, मार्गदर्शन, सल्लामसलत व योग्य असे अधिकार चालवून संस्था कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करणें अगत्याचें आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

दुसऱ्या महायुद्धाचे काळांत देशांत चलनवृद्धि फार झाल्यानें देशांतील बँकांचे ठेवीमध्यें मोठी वाढ झाली व ही वाढ सहकारी पतपेढ्यांमध्येंहि झाली. सहकारी

पतपेढ्या व मुख्यतः नागरी बँका यांजपुढें अशा ठेवीच्या रकमा किफायतशीर व्याजानें कशा गुंतवाव्यात याबद्दल काळजी उत्पन्न झाली. सभासदांना लागणारीं कर्जें पुरवून जादा रकम सरकारी कर्ज रोख्यांत अगर अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या सरकारमान्य रोख्यांत गुंतविणें मात्र प्राप्त झालें. परंतु सरकारनेंही व्याजाचे दर उतरविल्यामुळें अपेक्षेप्रमाणें यांत सहकारी संस्थांचा फायदा होऊं शकत नाहीं

नागरिकांना सहकारी कायद्याप्रमाणें पाळावयाचीं बंधनें लक्षांत घेतां व स्थानिक परिस्थिति लक्षांत घेतां नागरी बँकांनीं आतां आपली कार्यव्याप्ति वाढवून घेण्याची खटपट सुरू केली पाहिजे. स्थानिक व्यापारउद्दीम करणारे सभासद असल्यास त्यांना मालाचे तारणावर सुरक्षित असें कर्ज देण्याची व्यवस्था करणें शक्य आहे. तेथें त्यांनीं हा व्यवहार अवश्य सुरू करावा असें वाटतें. तसेंच औद्योगिक सहकारी पतपेढ्यांचा माल नागरी बँकांनीं विकून देण्याची व्यवस्था करणें शक्य झाल्यास, ग्रामीण औद्योगिक सहकारी संस्थांचे कार्यास चालना मिळेल.

सहकारी चळवळीच्या दृष्टीनें सरय्या समितीनें महत्त्वाच्या अशा सूचना केल्या असून त्याप्रमाणें दक्षतेनें पुढें पाऊल पडल्यास टिकाऊ अशी सहकारी चळवळीची प्रगति होईल. या सर्व सहकारी कार्यक्षेत्राचा पाय जो प्राथमिक पतपेढी त्यांच्या कार्यक्षमतेकडे जास्त लक्ष दिल्यासच सहकारी चळवळीची यशस्वी प्रगति होईल. ग्रामीण जनतेमधील अज्ञान, कार्यक्षम अशा नोकर वर्गाचा अभाव व गांवांतील मतभेद यामुळें प्रगति होऊं शकत नाहीं. तर समाजसेवेच्या भावनेनें प्रेरित होऊन जर योग्य असा नोकरवर्ग उपलब्ध झाला व त्यास सोसायटीचे कामकाजाची माहिती व शिक्षण देण्यांत आलें तर खेडेगांवांतील सोसायटी कार्यक्षम होऊन ग्रामीण जीवनांतील एक सन्माननीय असें स्थान मिळवील. असो. माझें भाषण संपविण्यापूर्वी आजचे अध्यक्ष प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांची ओळख करून देणें माझें कर्तव्य आहे. प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांची आज जमलेल्या सर्व प्रतिनिधी व प्रेक्षकांस ऐकून माहिती आहेच. आपल्या या देशांतील एक प्रतिथयश मिळविलेले असे अर्थशास्त्रज्ञ व मार्गदर्शक म्हणून त्यांची ख्याती असून अत्यंत स्पष्ट व तात्त्विक भूमिकेवरून स्वार्थत्यागपूर्वक विचार मांडणारे एक सहकारी कार्यकर्ते आहेत. अर्थशास्त्रज्ञ व सहकारी कार्यकर्ते या दृष्टीनें त्यांचा उपयोग सहकारी चळवळीस झाला आहे. आज ते प्रांतिक सहकारी बँक, रिझर्व्ह बँक यांचे संचालक मंडळावर असून शिवाय पुणें येथील मध्यवर्ती जिल्हा बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष असून शिवाय जिल्हा खरेदी विक्री संघाचेही अध्यक्ष आहेत. अशा अनुभवी अध्यक्षांची जोड आपल्यास लाभली आहे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे असें मजप्रमाणें आपणासही खास वाटेल. प्राचार्य गाडगीळ यांनीं

आपणा सर्वांच्या विनंतीस मान देऊन अध्यक्षस्थान स्वीकारलें याबद्दल मी आपणा सर्वांतर्फे आभार मानतों.

शेवटीं मजला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं आज गेलीं चाळीस वर्षें अनेक अडचणी सोसून सहकारी चळवळीस जें स्वरूप आलें आहे तें कायम टिकविण्याचा व त्याची स्वायतता आहे ती ठेवण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करावयास पाहिजे. सहकारी चळवळ ही एक दिवसांत अगर ठराविक वर्षांत अगर सरकारचे मदतीनें अगर कोणत्याही सहज साधनांनी यशस्वी होणार नसून ती या सहकारी चळवळींत आपण जे प्रत्यक्ष काम करणारे आहेत त्यांच्या सहनशीलतेवर, त्यागावर व विश्वासावर अवलंबन आहे हें ध्यानात ठेवलें पाहिजे व याद्दष्टीनें आपण सर्वजण प्रयत्नांची पराकाष्टा करावयास पाहिजे व तसा प्रयत्न आपण सर्व करूं या.

## मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन

# सर जनार्दन मदन ह्यांचें भाषण

आजच्या अधिवेशनाच्या प्रत्यक्ष कामास प्रारंभ होण्यापूर्वी, डॉ. धनंजय गाडगीळ यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति करण्याचें आनंददायक काम, स्वागत कमिटीनें माझ्यावर सोंपविलें आहे. प्रा. गाडगीळ हे एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ आहेत व त्यांचें नांव केवळ महाराष्ट्रांत नाहीं तर सबंध हिंदुस्थानांत माहित आहे. ॲग्रिकल्चरल फिनॅन्स कमिटीचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या रिपोर्टांतूनच नानावटी कमिटीचा जन्म झाला. माझी खात्री आहे कीं, प्रा. गाडगीळांचा सल्ला जर आपणांस वेळोवेळीं मिळाला तर सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांस आपले बरेच प्रश्न सुलभ रीतीनें सोडवितां येतील. प्रा. गाडगिळांच्या अर्थशास्त्रविषयक एकंदर कामगिरीचा आढावा घेण्याचें हें स्थळ नाहीं. गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स या संस्थेचे ते डायरेक्टर आहेत. या संस्थेमार्फत प्रसिद्ध होणारे ग्रंथ आपणांपैकी बऱ्याच जणांच्या माहितीचे असतीलच. माझे मित्र कै. प्रा. काळे ह्यांच्याप्रमाणें प्रा. गाडगीळ सहकारी क्षेत्रांत आपलेपणानें काम करतात. रिझर्व्ह बँकेच्या लोकल कमिटीचे ते डायरेक्टर आहेत. त्याचप्रमाणें मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे ते डायरेक्टर आहेत. चालू सालीं ते पुणें सेंट्रल बँकेचे अध्यक्ष निवडून आले ही एक आनंदाची गोष्ट आहे. आजपर्यंत प्रा. गाडगीळ ह्यांनीं अनेक सहकारी परिषदांचें अध्यक्षस्थान मंडित केलें आहे. तेव्हां, त्यांच्याकडून आपणांस योग्य मार्गदर्शन मिळेल ह्याबद्दल संशय नाहीं.

प्रा. गाडगीळ ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्यापूर्वी, सहकार्याबद्दल आपणां सर्वांच्या मनांत आज वावरत असणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा जातां जातां मी उल्लेख केला तर तो अप्रशस्त होणार नाहीं असें मला वाटतें. आज सुरू होणाऱ्या परिषदेसारखीच महाराष्ट्राची विभागीय सहकारी परिषद् १९३९ सालीं म्हणजे ८-९ वर्षांपूर्वी पुण्यास भरविण्यांत आली होती. १९३९ नंतर आजपर्यंतच्या काळांत हिंदी राष्ट्राच्या आणि पर्यायानें सहकारी आणि इतर आर्थिक चळवळींच्या क्षेत्रांत एवढ्या मोठ्या क्रांतिकारक घटना घडून आल्या आहेत कीं यापुढें आपण स्वतंत्र राष्ट्र म्हणून नांदणार असतांना आणि आपल्या देशाची आर्थिक घडी कशी असावी हें ठरविण्याचे सर्वस्वी हक्क आणि जबाबदारी आपल्यांकडे आली असतांना सहकारी क्षेत्रांतही सहकार्याच्या निरनिराळया आंगोपांगाकडे पाहण्याची एक नवीनच दृष्टि आपणांस प्राप्त झाली आहे, आणि त्यास अनुसरून आपल्यापुढें उत्पन्न झालेल्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां

आणि त्यासंबंधीं लोकमत अजमावण्याकरितां विभागीय परिषदेची अत्यंत जरूरी होती. ही जरूरी लक्षांत घेऊन प्रांतिक सहकारी संस्थेच्या आदेशाप्रमाणें विभागीय परिषद् भरवावी असा निर्णय महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं घेऊन त्याप्रमाणें आज ही परिषद् येथें बोलावण्यांत आली हें सहकारी चळवळीच्या वाढत्या आकांक्षांचें द्योतक आहे असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

१९४५ सालीं समाप्त झालेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर प्रत्येक राष्ट्रांत आणि विशेषतः हिंदुस्थानांत आर्थिक पुनर्घटनेच्या आणि नियोजनाच्या योजना प्रत्यक्षांत उतरविण्याचा प्रयत्न केंद्रीय आणि प्रांतिक सरकारांकडून होत आहे. सहकारी क्षेत्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या "सहकारी नियोजन" समिति आणि "शेतकी अर्थव्यवहार" समिती या दोन समित्यांनीं ज्या शिफारशी केल्या त्यांच्या अनुरोधानें सहकारी क्षेत्रांत काय फेरबदल करणें आवश्यक आहे हें आपणांस पहावयाचें आहे. "शेतकी अर्थव्यवहार" समितीचे डॉ. गाडगीळ हे अध्यक्ष होते व त्यांच्यासारखा अखिल भारतीय कीर्तीचा मान्यवंत अर्थशास्त्रज्ञ आज आपणांस मार्गदर्शक म्हणून लाभला हें महाराष्ट्रांतील सहकारी चळवळीचें भाग्यच होय.

सहकारी चळवळीचा मुंबई प्रांतापुरताच आढावा घेणें झाल्यास, मी तरी निःसंदिग्धपणें असें म्हणूं शकेन कीं १९४६ च्या एप्रिलमध्यें कॉंग्रेसनें अधिकार-स्वीकार केल्यानंतर आणि आपल्यापैकीं एक निष्ठावंत कार्यकर्ते श्री. वैकुंठराय मेहता हे सहकारी मंत्री झाल्यापासून गेल्या वर्षा दीड वर्षाच्या काळांत सहकारी क्षेत्रांतील निरनिराळ्या बाबींसंबंधीं पुष्कळच प्रगति झाली आहे, हें सरकारतर्फे प्रकाशित झालेल्या एका छोट्या पुस्तिकेवरून आपणांस विदित असेलच. स्थूलमानानें या प्रगतीपैकीं मुख्य अंगें म्हणजे सहकारी शिक्षण व प्रचार यांची पुनर्व्यवस्था, शेतकीच्या अर्थव्यवहाराबद्दलची व्यवस्था, सामुदायिक व सहकारी शेती, नियंत्रित बाजारपेठा, व औद्योगिक आणि ग्राहक सहकार हीं होत.

सहकारविषयक शिक्षण आणि प्रचार याबद्दल सरकारकडून जी समिती नेमली गेली होती त्या समितीच्या शिफारशी सरकारनें संपूर्णपणें मान्य करून त्या अमलांत आणण्याचें काम प्रांतिक सहकारी संस्थेकडे सोपविलें हें आपण सर्वजण जाणताच. जून १९४७ पासून आजमितीपर्यंत प्रांतिक संस्थेमार्फत को-ऑपरेटिव्ह कॉलेज व प्रादेशिक विभागीय शाळा व जिल्हेनिहाय शिक्षणाचे वर्ग कायम स्वरूपाच्या धर्तीवर सुरू करण्यांत आले आहेत. सहकारी चळवळीची वाढ या पुढील काळांत अधिकाधिक होणार असून चळवळीचें यशापयश बऱ्याच अंशी या चळवळींत काम करणाऱ्या सरकारी अगर बिनसरकारी व्यक्तींवर, त्यांच्या कार्यक्षमतेव

व त्यांच्या गुणावर अधिक अवलंबून आहे असें मला वाटतें. या दृष्टीनें सहकारी अभ्यास, शिक्षण व प्रचार यांची प्रांतिक संस्थेमार्फत झालेली व्यवस्था सहकारी चळवळीच्या एकंदरींत स्वरूपास कितपत साजेशी आहे व तींत आणखी कमी अधिक काय पाहिजे या प्रश्नांचा आपणांस विचार करावा लागेल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे डॉ. गाडगीळ यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमल्या गेलेल्या "शेतकी अर्थव्यवहार" समितीच्या शिफारसींतून निर्माण झालेली ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनची कल्पना मुंबई प्रांताच्या दृष्टीनें कितपत विचारार्ह आहे या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरितां सर मणीलाल नाणावटी यांच्या अध्यक्षतेखालीं जी समिती नेमली तिच्या शिफारशी होत. या समितीनें ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा उहापोह सहकारी क्षेत्रांत काम करणाऱ्या निरनिराळया व्यक्ती व संस्था यांजकडून होत आहे. तरी सदर प्रश्नासंबंधीं अनुकूल प्रतिकूल विचारांची चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें त्याचा समन्वय घालणारी व्यवहार्य योजना पुढें ठेवणें हेंही आपल्यापुढील काम आहे.

सहकारी कार्याच्या प्रत्यक्ष भागासंबंधीं चर्चा करून आपलें काम संपलें असें नाहीं. या देशांत व आपल्या प्रांतांत सहकारी चळवळ सुरू होऊन तीन तपांवर काळ लोटला आहे. सहकार प्रवृत्ति ही आतां सहकारी चळवळ या सदरांत राहिली नसून तिचें स्वरूप आतां सुसंघटित व नियंत्रित अशा पद्धतींत झालें आहे. त्याचप्रमाणें सहकारी चळवळीचें ऐच्छिक तत्त्व ध्यानांत घेतां सहकार व सरकार यांचे अन्योन्य संबंध काय असावेत, सहकार पद्धती नियंत्रित असावी किंवा कसें इत्यादि तात्त्विक आणि वैचारिक मुद्यांचाहि खल आपल्या अधिवेशनांत होणें अगत्याचें आहे.

गेलीं कित्येक वर्षें सहकारी चळवळीविरुद्ध एक ठराविक आक्षेप घेण्यांत येत असे, कीं ही चळवळ परकीय सत्तेकडून अधिकारी वर्गाकरवी जनतेवर लादली गेली आहे. परंतु आज सर्व परिस्थिती इतकी झपाट्यानें बदलली आहे कीं, त्या आक्षेपाचें खंडण करीत बसण्याची वेळच राहिली नाहीं. देशांतील सर्व राजकीय व आर्थिक पक्षांनीं सहकार्याच्या तत्त्वाची उपयुक्तता मान्य केली असून स्वतंत्र भारताचें आर्थिक उद्दिष्ट "सहकाराधिष्ठित समाज व्यवस्था" (Co-operative Commonwealth) आहे, असें अधिकृतरित्या नमूद करण्यांत आलें आहे. देशांतील प्रत्येक व्यक्ती ही जनतेची सेवक होत. या दृष्टीनें सहकार पद्धतीवर सरकारचा जितका हक्क पोंचतो तितकाच जनतेचा पोंचतो. सहकाराच्या वाढीबद्दल सरकारकडून जी जी आर्थिक मदत निरनिराळया सहकारी संस्थांना मिळत आहे अगर यापुढें मिळेल ती मदतही सरकारनें चळवळीला बहाल केलेली मेहेर नजर या दृष्टीनें न पहातां, लोकमतानुवर्ती व लोकसत्ताधिष्ठित जबाबदार राज्यपद्धती

वरील ती एक नैतिक जबाबदारी आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. परंतु या आर्थिक मदतींबरोबर सहजप्राय येणाऱ्या नियंत्रणाचा अंमल कुठच्या कक्षेपर्यंत यावा व कोणत्या परिसीमेवर तो थांबावा या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचाही आपल्याकडून विचार होणें आवश्यक आहे.

त्याचप्रमाणें मुंबई प्रांतांतील व विशेषतः महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतील शेतकरी वर्गास अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न म्हणजे अन्नधान्य नियंत्रणाचा होय. युद्धजन्य परिस्थितींत निर्माण केलेलीं नियंत्रणें रद्द करण्याचा निर्णय केंद्रीय व प्रांतिक सरकारींनीं नुकताच घेतला आहे व क्रमाक्रमानें हीं नियंत्रणें संपूर्ण दूर होतील. नियंत्रण कालांत मिळालेल्या सवलतीचा फायदा मिळून सहकारी खरेदी विक्री व ग्राहक सहकार यांची खूपच वाढ गेल्या २।३ वर्षांत झाली होती. परंतु नियंत्रणें दूर झाल्यानें सहकारी चळवळींतील हें एक नवीन दालन बंद होईल कीं काय अशी भीती वाटत आहे. डॉ. गाडगीळ हे हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या भाव नियंत्रण मंडळाचे सदस्य होते व या विषयाकडे पहाण्याचा त्यांचा स्वतंत्र दृष्टिकोन आहे. त्यामुळें सहकारी कार्यकर्त्यांचें या महत्त्वाच्या विषयासंबंधीं काय धोरण असावें हें ठरविण्यांत डॉ. गाडगीळ यांचा आपणांस बहुमोल उपयोग होईल.

माझें हें फारच लांबलेलें प्रास्ताविक भाषण संपविण्यापूर्वी, व डॉ. गाडगीळांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची पुनः एकदां विनंती करण्यापूर्वी मी आपणांस आणखी एक आनंदाची गोष्ट सांगूं इच्छितो. प्रांतिक सहकारी संस्थेच्या नेतृत्वाखालीं मुंबई प्रांतिक सहकारी परिषद भरविण्याचें नक्की झालें असून सदरहू परिषद मुंबईस एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत भरविण्यांत येईल. सर व्ही. टी. कृष्णमाचारी यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे. प्रांतिक परिषदेंत जे विषय चर्चेस येतील ते विभागीय परिषदेंत येणाऱ्या विषयांच्या अनुरोधानेंच असतील या दृष्टीनें आपल्या परिषदेचें महत्त्व विशेषच आहे. सहकारी क्षेत्रांत उत्पन्न झालेल्या सर्व निकडीच्या आणि दूरगामी प्रश्नांचा आपण साकल्यानें विचार करून कार्यास योग्य तें मार्गदर्शन कराल अशी आशा व्यक्त करून आपणा सर्वांच्या वतीनें मी डॉ. गाडगीळांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना करतों.

# महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें

अध्यक्ष

## प्रिं. ध. रा. गाडगीळ, एम्. ए., एम्. लिट्., ह्यांचें भाषण

सहकारी बंधुभगिनींनो—

महाराष्ट्र सहकारी परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन आपण जो माझा गौरव केला त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानतों. महाराष्ट्रांतील सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांची मला असावयास हवी तेवढी दीर्घकालीन अगर दाट ओळख नाहीं. तरी, केवळ आपली सहानुभूति व सहकार्य यावर विसंबून मीं आज अध्यक्षस्थानाची जबाबदारी पत्करण्याचें धाडस केलें आहे.

महाराष्ट्र सहकारी परिषदेचें यापूर्वीचें अधिवेशन बरेच वर्षांपूर्वी झालें असल्यामुळें सहकारी चळवळीच्या अलीकडील इतिहासाचा प्रथम आढावा घेणें हें आवश्यक आहे. मी आपल्या भाषणांत या बाबतींत फार तपशीलवार विचार करणार नाहीं. सहकारी चळवळीच्या सर्वांगीण प्रगतीचे अगदीं अलीकडील जिल्हावार आंकडे प्रसिद्ध झाले नसल्यामुळें महाराष्ट्राबाबत असें कांहीं निराळे आंकडेसिद्ध सांगणें शक्य नाहीं. थोड्याच महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या नानावटी समितीच्या अहवालाच्या परिशिष्टांत कांहीं जिल्हावार आंकडे दिले आहेत, ते १९४५–४६ सालाचे आहेत. हे जिल्हावार आंकडे जिल्हा मध्यवर्ती बँका, प्राथमिक मॉर्टगेज बँका व खरेदी–विक्री संघ याबाबतचे आहेत. प्राथमिक पतपेढ्यांबाबत जिल्हावार फोड या परिशिष्टांत दिलेली नाहीं. तरी, मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या भागांची परिस्थिति फारशी भिन्न नाहीं, असें मानल्यास नानावटी समितीच्या पांचव्या परिशिष्टांत प्राथमिक पतपेढ्यांबाबत दिलेल्या आंकड्यांवरून कांहीं ठोकळ विधानें करतां येतील. लढाईचे काळांत प्राथमिक पतपेढ्यांची संख्या, त्यांच्या सभासदांची संख्या, पेढ्यांचें स्वतःचें भांडवल, त्यांची प्रतिवार्षिक कर्जवसुली या सर्वांत वाढ झाली असून थकबाकी पुष्कळ अंशीं कमी झाली आहे. हीं सर्वच प्रगतीचीं चिन्हें समजलीं पाहिजेत. याबरोबरच सबंध कालखंडाचा विचार करतां सभासदांच्या ठेवींच्या रकमेंत कांहीं वाढ झालेली नाहीं हें लक्षांत घेण्याजोगें आहे. हे आंकडे आणि मला उपलब्ध असलेली इतर आंकडेवार माहिती यांवरून प्रगतीबाबत अभिप्राय द्यावयाचा तर तो असाः—युद्धकाळाचा पतपेढ्यांवरील मुख्य

परिणाम म्हणजे थकबाकी पुष्कळ वसूल होऊन पतपेढ्यांचें कार्य बरेंच सुरळीतपणें चालण्याची शक्यता निर्माण झाली. तसेंच सरासरीनें पाहतां दर सभासदावरील कर्जाचा बोजा कांहींसा कमी झाला. मात्र हें कर्ज कमी होण्याचें सरासरी प्रमाण अल्पच आहे व तें सगळीकडे सारखेंच कमी झालेलें नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. कर्जाची रक्कम सर्वत्र कमी झाली नसली तरी आज तरी कर्जाचा बोजा सर्वांवरीलच पूर्वीच्या मानानें पुष्कळ उतरला आहे. याचें कारण एकंदर किंमतवाढ. जों पावेतों चालू शेती मालाच्या किंमती किफायतशीर आहेत तोंपावेतों आजचा शेतकऱ्यावरील बोजा सर्वसाधारण वाढलेल्या किंमतीच्या मानानें दहा वर्षांपूर्वीपेक्षां फार कमी झाला आहे हें निर्विवाद आहे. याच घटनेची दुसरी बाजू म्हणून पुढील विचार येथेंच मांडला पाहिजे. शेतकऱ्यानें काढलेल्या कर्जाच्या रकमेंत वाढ झाली नाहीं याचा अर्थ त्यास तितकीशी कर्जाची वस्तुतः नड नाहीं असा दिसतो. पूर्वीप्रमाणें कर्जाची नड लागूं लागली म्हणजे खर्च सगळेच फार वाढल्यामुळें या कर्जाची रक्कम पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें जास्त होईल. आवक व जावक दोन्ही आंकडे सारखेच फुगीर असल्यास वाढत्या रकमेच्या कर्जाची परतफेड शेतकरी करूं शकेल. परंतु आवक घटण्याचा, एकदम किंमती उतरल्यामुळें, जर प्रसंग आला तर मात्र एकंदर चक्राचें परिभ्रमण पुरें झाल्यावर शेतकऱ्याचें कर्ज त्याच्या परतफेडीच्या ऐपतीच्या मानानें जादा झालेलें दिसेल; म्हणजे युद्धपूर्वकालीन परिस्थितीच पुन्हां प्राप्त होईल. या भविष्यांतील संभाव्य घडामोडीकडे लक्ष वेधण्याचें कारण हें कीं यथाक्रम प्राप्त होऊं पहाणाऱ्या मंदीच्या दिवसांकरितां कांहींही तरतूद सहकारी मंडळ्यांच्या सभासदांनीं करून ठेवलेली दिसत नाहीं. शेतकऱ्यास युद्धकालांत इतर म्हणतात तितका फायदाच झाला नाहीं म्हणा, अगर त्या फायद्याचा उपयोग त्यानें योग्य रीतीनें करून घेतला नाहीं म्हणा, युद्धकालांतील तेजीच्यामुळें महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचें आर्थिक सामर्थ्य बरेंच वाढलें आहे असें सहकारी पतपेढ्यांबाबतचे अगर इतर कोणतेच आंकडे दर्शवित नाहींत.

प्राथमिक पतपेढ्यांचा कारभार युद्धकालांत फार वाढला नसला तरी एकंदर जास्त सुस्थितींत आला. प्राथमिक मॉर्ट्गेज बँकांचा व्यवहार याच काळांत इतका रोडावला कीं कांहीं जिल्ह्यांत त्यां चालू ठेवण्याचें प्रयोजनच काय, असा प्रश्न उद्भवला. खरेदी-विक्री संघांनीं मात्र गेल्या दहा वर्षांत फार मोठी प्रगति करून दाखविली. सकृद्दर्शनीं याबाबतचे आंकडे फार समाधानकारक वाटतात. पण ही सर्व वाढ नियंत्रित व्यवहार व सरकारी पुरस्कार यामुळें झाली आहे, हें आपणा सर्वांस पक्कें माहित आहे व आज नियंत्रणें उठल्यामुळें या खरेदी-विक्री संघ व्यवस्थेचें पुढें काय होणार याच्या विवंचनेंत आपण सर्वजण आहों. तेव्हां हे आंकडे भविष्यकालीन परिस्थिति अजमावण्यास उपयोगी नाहींत हें उघड आहे. याचबरोबर या आंकड्यांवरून जी एक गोष्ट सिद्ध झाली आहे तिजकडे सहकारी कार्यकर्त्यांनीं सर्व जनतेचें प्रामुख्यानें लक्ष वेधणें जरूर आहे. अनुकूल परिस्थिति व उचित सरकारी पाठिंबा मिळाला असतां, सहकारी संस्था, वाहतूक व व्यापार (घाऊक-किरकोळ) फार मोठ्या प्रमाणावर थोड्या अवधींत हातीं घेऊं शकतात. पद्धतशीर, नियंत्रित व्यापारी

व्यवहारांत सहकारी संस्थांस प्रगति फार लवकर करतां येते, एवढेंच नव्हे तर असल्या परिस्थितींत त्यांचें कार्य खाजगी व्यवहारापेक्षां जास्त चोख व कमी खर्चिक होऊं शकतें. अर्थात हें शेवटचें विधान सिद्ध करण्यास आंकडे लगेच देतां येणार नाहींत. पण ज्यांना युद्धकालीन व्यवहाराचा दोन्हीं पक्षी अनुभव आहे ते त्रयस्थदेखील हें विधान चटकन मान्य करतील एवढी याची बाजू बळकट आहे. शिवाय सहकारी संस्थांचा व्यवहार आणखी थोडा अवधि व स्वस्थपणा मिळाला तर याहूनही पुष्कळपणें सुधारून दाखविणें सोपें आहे असें यांतील सर्व अनुभविक सांगू शकतील.

गेल्या कांहीं वर्षांचा आढावा घेतांना सहकारी संस्थांच्या प्रगतीबरोबर कांहीं सहकारी कायद्यांचा विचार करणेंही जरूर आहे. मुख्यतः दोन कायदे सहकारी व्यवहारांशीं विशेष निगडित आहेत. पहिला ऋणविमोचन कायदा. हा कायदा अंमलांत येऊन जरी बरींच वर्षें झालीं तरी तो अलीकडेच सगळीकडे लागू करणेंत आला आहे. सहकारी पतपेढ्यांनीं सभासदास दिलेल्या कर्जावर या कायद्याचा विशेष परिणाम होईल अशी अपेक्षा नाहीं. तसेंच सहकारी पतपेढ्यांच्या ज्या सभासदांनीं ऋणविमोचन कायद्याखालीं अर्ज केलेले नाहींत त्यांच्या नित्याच्या व्यवहारांतही कांहीं फरक होत नाहीं; परंतु अनेक सभासदांनीं व बिगर-सभासद शेतकऱ्यांनीं या कायद्याखालीं अर्ज केलेले असून त्यांचा कायम निकाल होण्यास बराच अवधि लागण्याचा संभव आहे. अर्जदारांच्या अर्जांचा निकाल लागल्यावर त्यांची पत काय राहील व त्यांस कर्जें कोठून व कधीं मिळतील याचा अजून स्पष्ट विचार करणें शक्य नाहीं. आजचा मुख्य प्रश्न संक्रमणावस्थेचा आहे. या संक्रमणावस्थेंत कर्जदारांस जमीन तारण लावतां येत नाहीं, तेव्हां त्यांची पैशाची गरज भागविण्याची निराळी योजना करण्यास हवी. या योजनेंत सहकारी संस्थांनीं प्रामुख्यानें भाग घ्यावा अशी सरकारची अपेक्षा आहे. ऋणविमोचन कायद्याचे दूरवर परिणाम काय होतील ते होवोत; या कायद्याच्या अंमलामुळें तात्काळ शेतकी सावकारी व्यवहारांत तंगी निर्माण झाली असून ती निवारण्याचा प्रयत्न करणें सरकारदृष्ट्या अत्यावश्यक आहे. या प्रयत्नांत सहकारी संस्थांस मदत करून आपलें कार्यक्षेत्र पुष्कळच वाढविण्याची शक्यता आहे. तसेंच हें करीत असतां कांहीं नवीन प्रकारची व्यवहार पद्धतीही स्वीकारावी लागेल. यामधून उद्भविलेले प्रश्न आज फार महत्त्वाचे होऊन बसले आहेत.

सावकार नियंत्रण कायदा, ऋणविमोचन कायद्याहूनही जास्त महत्वाचा समजला पाहिजे. या कायद्यामुळें खाजगी सावकारीवर बऱ्याच प्रकारचीं नियंत्रणें घातलीं गेलीं आहेत. या सर्व नियंत्रणांचा येथ विचार करण्याची जरूरी नाहीं. सहकारी संस्थांचे दृष्टीनें महत्वाचें नियंत्रण व्याजाच्या दराबद्दलचें. याचे परिणाम दोन प्रकारचे आहेत. प्रत्यक्ष परिणाम सहकारी पतपेढ्यांच्या व्याजांच्या दराबाबतचा. सरकारी नियंत्रण कायद्यांतील दरांहून अधिक दर सहकारी कर्जाचे पडत नाहींत याबाबत आपण खबरदारी घेणें अर्थात आवश्यक आहे. हें करण्याकरितां आपणांस पुढें मागें सरकारी मदतही कदाचित मागावी लागेल; आजच परिस्थिति तशी आली नाहीं, त्यामुळें प्रत्यक्ष परिणाम फार महत्वाचा नाहीं. अप्रत्यक्ष

परिणाम खाजगी सावकारीचा व्याप व तिचे भविष्यांतील स्वरूप याबाबतचा. सरकारनें कायद्यांत घातलेले व्याजाचे दर हे इतके कमी आहेत कीं यापुढें कायदेशीररीत्या चाललेल्या सावकारी व्यवहाराचें क्षेत्र महाराष्ट्रांत तरी फार संकुचित होईल याबद्दल मला खात्री वाटते. तेव्हां यापुढें सावकारी काळाबाजार माजून कायद्यामुळें शेतकऱ्यांचा फायद्याऐवजीं तोटा होण्याचाच संभव अधिक. हा परिणाम टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे खाजगी सावकारा-एवजीं कोणत्यातरी संस्थेमार्फत शेतकऱ्यास आपल्या ऐपतीप्रमाणें कर्ज मिळण्याची व्यवस्था तावडतोब झाली पाहिजे. सहकारी संस्थांवर होणारा हा सावकारी नियंत्रण कायद्याचा अप्रत्यक्ष परिणाम आहे. आतां सहकारी संस्थांस आपलें क्षेत्र वाढविण्याची मोठी संधी चालून आली आहे, एवढेंच नव्हे तर सहकारी व्यवहार सार्वत्रिक होऊं शकतो किंवा नाहीं हें पुढील दोन तीन वर्षांत कायद्यांनीं निर्माण केलेल्या परिस्थितीमुळें प्रत्यक्ष अजमावलेंच जाणार आहे.

सहकारी संस्थांपुढील कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यास उपयोग व्हावा म्हणून सद्यःस्थितीचें वरील त्रोटक वर्णन केलें आहे. सहकारी चळवळीची आजची परिस्थिति फारशी समाधानकारक नाहीं. तिची पुनर्घटना झाली पाहिजे हेंहि आज सर्वमान्य आहे. तसेंच ही पुनर्घटना योजनापूर्वक झाली पाहिजे असें सर्व म्हणतात. या प्रांताचे आजचे सहकारी मंत्री ना. वै. मेहता यांनीं सहकारी चळवळीच्या नियोजनाबद्दल आग्रहाची व मुद्देसूद मागणी पुणें येथेंच एका जाहीर व्याख्यानांत जवळ जवळ सहा वर्षांपूर्वी केली. अलीकडच्या काळांत आपल्या देशांत या मागणीस सर्वत्र दुजोरा मिळाला आहे, एवढेंच नव्हें तर एका सरकारी समितीकडून पुढील योजनेचा आराखडाही तयार करण्यांत आला आहे. सहकारी प्रगतीच्या सर्व योजनांत एक अडचण सुरुवातीसच भासते. सहकारी संघटना ही स्वेच्छेनें सहकार्य करणाऱ्यांची संघटना. त्यांत सक्तीचा लेशही नाहीं हें मूलतत्त्व. या तत्वानुसार वागावयाचें तर ठराविक काळांत अमुक क्षेत्रांत इतक्या नवीन सहकारी संस्था अस्तित्वांत आल्या पाहिजेत किंवा प्रस्तुत संस्थांची निश्चित मर्यादेनुसार प्रगति झालीच पाहिजे असें जरी म्हटलें तरी तें घडवून कसें आणावयाचें? नियोजन व सहकारी चळवळीचें सनातन तत्त्व यांतील विसंगति कोणच्याही लक्षांत येण्यासारखी ढोबळ आहे.

हिंदुस्थानांतील सहकारी परिषदांनीं इकडे नेहमीं लक्ष दिलेंच असें मात्र नाहीं. बऱ्याच परिषदांतून नियोजनपूर्वक प्रगतीची मागणी आणि अंतर्गत सक्ति व बाह्य मार्गदर्शन वे नियंत्रण यांपासून सहकारी चळवळीची अलिप्तता या सर्वच मुद्यांवर निरनिराळ्या ठरावांतून भर दिलेला आढळतो. अर्थात्, परिषदांस हा प्रश्न जरी टाळतां आला तरी सहकारी प्रगतीची योजना करण्यास नेमलेल्या समितीस तो डावलणें शक्य नव्हतें. तेव्हां या समितीचे (सरैय्या समिती) अहवालांत याचें निराकारण करण्याचा अल्पसा प्रयत्न झाला आहे. कोणासही सहकारी संस्थेचे सभासद होण्यास भाग पाडूं नये या तत्त्वाची समितीनें पुनर्घोषणा केली आहे. परंतु कांहीं सरकार सवलती अगर मदत सहकारी संस्थेचे सभासद झाल्याशिवाय न मिळाव्या अशा अप्रत्यक्ष सक्तीच्या योजनेस समितीची आडकाठी नाहीं

याखेरीज नियोजित प्रगति करण्यास शिक्षण आणि प्रचार हींच मुख्य साधनें असा अभिप्राय आहे. शिक्षण व प्रचार यावर समितीची भिस्त किती व अप्रत्यक्ष सक्तीवर किती हें स्पष्ट कळणें कठीण आहे. परंतु नियंत्रित आर्थिक व्यवहार हें समितीचें एक गृहीत प्रमेय असल्या-मुळें अप्रत्यक्ष सक्तीनें बराच कार्यभाग होईल असें समितीस वाटलें असण्याचा संभव आहे. या प्रश्नाचा विचार आणखी पुढें करण्यांत येईल. येथें सहकारी चळवळीची नियोजित प्रगति निश्चित कशी साधावयाची याचें धडसें उत्तर सरैय्या समिति, नानावटी समिति इ. सरकारी समित्यांनीं दिलें नाहीं एवढेंच नमूद केलेलें पुरें.

नियोजित पुनर्घटनेंत निश्चित प्रगति किती व कशी होईल हें जरी स्पष्ट नसलें तरी पुनर्घटनेच्या एकंदर उद्दिष्टाबद्दल बरीच एकवाक्यता आढळून येते. सहकार्याचा अवलंब केल्यानें आर्थिक प्रगति लोकशाहीच्या मार्गास अनुसरून साधतां येईल असाच सर्वांचा अभि-प्राय आणि हेंच मुख्य उद्दिष्ट. अर्थात हा फार व्यापक विचार झाला. प्रत्यक्ष कार्यकर्त्यांस याहून बऱ्याच तपशिलांत शिरणें आवश्यक आहे. सहकारी चळवळ सर्वव्यापी असल्यामुळें सर्वच तपशिलाचा मर्यादित अवधींत विचार करणें शक्य नाहीं, तरी मी आज आपणांपुढील निकडीच्या अशा दोन तीन मुद्यांकडे लक्ष देण्याचें योजिलें आहे. नागर प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शेतकी व शेतकरी यांशीं निगडित असलेल्या प्रश्नांचाच मी आज सावकारी व्यवहार व व्यापारी व्यवहार या दोन दृष्टीनें विचार करणार आहे. शेतकीच्या सावकारी व्यवहाराबाब-तच्या सद्यःस्थितीचें मी थोडक्यांत दिग्दर्शन वर केलें आहे. गेल्या कांहीं वर्षांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें शेतकऱ्यास कर्जाची नड पूर्वीइतकी तात्पुरती तरी राहिली नाहीं हें खरें असलें तरी, आजची गरज भागविणें व पुढील संभाव्य वाढत्या गरजांची तरतूद करणें हें क्रमाक्रमानें जास्त अवघड व महाग होत आहे हेंही तितकेंच उघड आहे. या स्थितीस सरकारी कायदेच बहुतांशीं कारणीभूत आहेत. हे कायदे मूळतः वाईट नव्हेत, किंबहुना अशा प्रकारच्या काय-द्यांच्या जरूरीबद्दल दुमत जवळ जवळ नाहींच. परंतु हे कायदे स्वयंपूर्ण नसून एकंदर पुनर्घटना योजनेचा ते एक भाग आहेत व पुनर्घटना योजना समग्र हातीं घेतल्याशिवाय केवळ कायद्यांच्या अंमलबजावणीचा फायदा होण्याऐवजीं दुष्परिणामच अधिक घडण्याचा संभव आहे. जुन्या कर्जाची हप्तेबंदी करून खाजगी सावकारीवर नियंत्रण घालण्याच्या वेळेसच शेतकऱ्यास आवश्यक व योग्य कर्ज मिळण्याची तरतूद न केल्यास त्यास पुन्हां जुन्या सावकारांचा आसरा पाहावा लागणार, पण तो मिळणें बिकट होणार. खाजगी सावकारीची जागा सहकारी पेढीनें घ्यावी हें उद्दिष्ट पुढें ठेऊन आपली चळवळ आज ३०–४० वर्षें सुरू आहे; या दिशेनें थोडी बहुत प्रगतीही झाली आहे. परंतु नवीन कायद्यांचा अंमल सार्वत्रिक सुरू झाल्यानंतर कोणाही व कोठल्याहि शेतकऱ्यास त्याच्या पतीप्रमाणें आवश्यक रक्कम सुलभतेनें मिळूं शकेल इतकी प्रगति सहकारी चळवळीची खास झालेली नाहीं. यामुळें शेतकऱ्याच्या सावकारी व्यवहाराबद्दलचा प्रस्तुतचा मुख्य प्रश्न उद्यां खाजगी सावकाराचें उच्चाटन केलें असतां, त्याची जागा कोण घेणार हाच आहे. खाजगी सावकाराचें पूर्णतया उच्चाटण न करितां त्याचें व्यवहार खरोखर नियंत्रित व व्यवस्थित करायाचें म्हटलें तरी हाच मुख्य प्रश्न उभा राहतो.

प्रत्येक शेतकऱ्यास खाजगी सावकाराचे ऐवजीं सरकार, निम-सरकारी संस्था किंवा सहकारी व्यवस्था या पैकीं कोणाचा तरी आधार निश्चित असल्याशिवाय सावकारी नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी देखील नीट होऊं शकत नाहीं हा आजचा अनुभव आहे. आज शेतकरी अनन्यगतिक आहे. सावकाराशिवाय त्यास गत्यंतर नाहीं. ऋण-विमोचन कायदा, सावकारी नियंत्रण कायदा हे अमलांत आणण्याच्या वेळेस, किंबहुना त्याचे आधीच, या अडचणींचे निराकरण करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. या परिस्थितींत सहकारी संस्थेची जबाबदारी काय हा आपल्या पुढील प्रश्न आहे.

येथें दोन पर्याय संभवतात. सहकारी संस्थांची कार्यपद्धति व प्रगतीची दिशा हीं पूर्वापार ठरलेली आहे. यांत विशेष बदल केला असतां सहकारी तत्वांची हानि होण्याचा संभव फार, त्याअर्थी प्राप्त परिस्थितींत सहकारी संस्थांची संख्या व कार्यक्षेत्र वाढविण्याचा जरी निकरानें प्रयत्न झाला, तरी निश्चित सार्वत्रिक कर्ज वांटपाची योजना सरकारनें स्वतंत्र अलग योजने-नुसार करणेंच इष्ट; इतकी मोठी व मानगडीची जबाबदारी सहकारी संस्थांनीं घेऊं नये. हा एक विचार झाला. दुसरा विचार असा कीं, सहकारी संस्था त्यांतल्या त्यांत पुष्कळ फैलाव-लेल्या, त्यांची कार्यपद्धति शेतकऱ्यांस बरीच परिचित, त्यांत कार्यकर्ते अनेक, एकंदर व्यवस्था अल्पखर्चिक, व पूर्ण सरकारी योजनेपेक्षां पुष्कळच जास्त लोकशाहीस पोषक. म्हणून ही सरकारवर पडलेली जबाबदारी सहकारी संस्थांनींच पार पाडण्याचें काम पत्करावें हें देशहितदृष्ट्या श्रेयस्कर. अर्थात् हें होणें म्हणजे बरीच सरकारी मदत आवश्यक, तसेंच काम सार्वत्रिक व निश्चित करावयाचें तर कांहीं मार्गदर्शन व नियंत्रण पत्करून सहकारी तत्वांस मुरड घालणें अपरिहार्य.

याबाबत कोणता मार्ग पत्करावा हें मुंबई प्रांतांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं गतवर्षीच ठरविलें. एखादी सरकारी संस्था शेतकऱ्यास पैसा पुरविण्याचें कार्य जितकें करील तितकें करण्याची सहकारी संस्थांची तयारी असून या प्रीत्यर्थ सहकारी संस्था —विशेषतः बँका— यांची पुनर्घटना किती व कशी करावी हें सरकारनें एक समिति नेमून निश्चित करावें असा मु. प्रां. स. बँकांच्या मंडळानें ठराव केला. या ठरावानुसार सरकारनें सर मणीलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली व या समितीचा अहवाल कांहीं महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाला आहे. नानावटी समितीची मूलभूत शिफारस मुं. प्रां. स. बँकेस मध्यवर्ती मानून पुढील व्यवस्था व कारभार करावा अशी आहे. सहकारी मंडळाचें कार्य व प्रगति, सहकारी मंडळ्या व जिल्हा बँकांचे संबंध, जिल्हा बँकांची कार्यपद्धति व विस्तार या सर्व बाबी प्रांतिक सहकारी बँकेचे अधिकारक्षेत्रांत आल्या म्हणजेच इष्ट कार्य घडून येईल असा या समि-तीचा अभिप्राय आहे. या नवीन धोरणानुसार प्रांतांतील सहकारी संस्थांची पुर्नव्यवस्था करतांना ज्या अनेक घडामोडी क्रमप्राप्त आहेत त्यांचा सांगोपांग तपशिलवार विचार नानावटी समितीनें दुर्दैवानें केला नाहीं. यामुळें नवीन जबाबदारी पत्करावयाची म्हणजे आपल्या सद्यःस्थितींत काय फरक करावा लागेल याची स्पष्ट कल्पना समितीचें कार्य चाललें असतां किंवा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरही जिल्हा बँका, अगर प्रां.

बँक यांस आला नाहीं. या सर्व गोष्टींची आवश्यकता, नानावटी समितीच्या शिफारसींच्या विचाराप्रीत्यर्थ सहकारी मंत्र्यांनीं प्रां. बँकेच्या प्रतिनिधींशीं वाटाघाटी सुरू झाल्यावरच पटली व आज सहकारी बँकांवरच पुनर्घटनेची तपशिलवार योजना करण्याचा प्रसंग आला आहे. या योजनेचा एक मसुदा सर्व बँकांकडे विचारार्थ पाठविलेला असून आपल्या परिषदेंत त्याचा सांगोपांग विचार होईल अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या प्रास्ताविक भाषणांत या योजनेचा खल करणें मी अप्रस्तुत मानतो. मात्र परिषदेंत विचार करीत असतां तो कोणत्या दृष्टीनें मुख्यतः करणें आवश्यक आहे, या विषयींचें माझें मत येथें नमूद करणें अयोग्य नाहीं. सनातन सहकारी तत्त्वें व निरनिराळ्या सहकारी संस्थांचें अधिकारस्वातंत्र्य एवढ्याच भूमिकावरून आपणांस या प्रश्नाकडे पाहणें शक्य नाहीं. सरकारी अगर निम-सरकारी स्वतंत्र शेतकी बँक काढण्याऐवजीं सहकारी संस्थांमार्फत हें कार्य करावें असें म्हटलें म्हणजे त्यांतूनच यथाक्रम बिगर सभासदांशीं व्यवहार, ठराविक योजनेप्रमाणें प्रगति, निरनिराळ्या श्रेणींच्या सहकारी संस्थांच्या परस्पर संबंधांचें स्पष्टीकरण व दृढीकरण, प्रांतिक बँकेचें मध्यवर्ति स्थान, सरकारचें मार्गदर्शन व नियंत्रण या सर्व गोष्टी आल्या. अर्थात कार्याच्या दृष्टीनें यांतील कोणत्या बाबी कितपत आवश्यक व अनावश्यक याचा तपशिलवार विचार करणें योग्यच. परंतु सरकारनें कार्य तर आमच्याचकडे सोपवावें, आम्ही मात्र पुनर्व्यवस्था करण्यास अगर नियंत्रण पत्करण्यास तयार नाहीं ही, अगर तपशिलाचा विचार आज कशाला जसा प्रश्न उद्भवेल तसें पाहून घेवूं ही, यापैकीं कोणतीच भूमिका आपणास पत्करणें शक्य नाहीं, असें माझें स्पष्ट मत आहे.

सहकारी संस्थांची अंतर्व्यवस्था व परस्पर संबंध याबद्दल जरी कांहीं बोललों नाहीं तरी त्यांच्या व्यवहार पद्धतीबाबतच्या एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी आपलें लक्ष वेधणार आहे. सहकारी सावकारी व्यवहार परस्पर सहाय्यावर अवलंबून असून शेतकऱ्याच्या जिंदगीपेक्षां त्याच्या पतीवर तो चालतो ही मांडणी जुनी आहे. यास अनुसरून कर्ज जमीनीच्या तारणांवर दिलें असतां सहकारी तत्त्वास सोडून व्यवहार होत आहे अशी टीका करण्याचा प्रघात पडला आहे. जोंपावेतों वाद शाब्दिक होता तोंपावेतो त्याकडे लक्ष देण्याचें विशेष कारण नव्हतें. जिंदगी पत्रकांकडे उघड लक्ष दिलें अगर न दिलें तरी अंतीं जमीनीवरच दृष्टी सर्वांची राहात होती. बरेच वर्षें पावेतों सर्व प्रकारच्या मुदतीचीं कर्जेंही एकाच संस्थेकडून दिलीं जात असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत तात्विक वादामुळें कांहीं अडथळा उत्पन्न होत नव्हता. परंतु अलीकडील दहापंधरा वर्षांत लांब मुदतीचीं कर्जें जमिनीचें तारणावर देण्याकरितां अगदीं वेगळ्या सहकारी बँका काढण्यांत आल्या आहेत व दिवसें दिवस सामान्य सोसायट्या व बँका यांचा व्यवहार छोट्या मुदतीचा व जमिनीवरील बोजावर अवलंबून नसलेला असा असण्याबद्दल आग्रह वाढला आहे. मुंबई प्रांतांत ह्यांतच ऋणविमोचन कायद्यानें निर्माण केलेल्या परिस्थितीची भर पडली आहे. या कायद्याखालीं अर्ज केलेल्यास अर्जाचा कायम निकाल लागेपावेतों जमिनीवर बोजा उत्पन्न करितां येत नाहीं व नवीन कर्ज केवळ पतीवर अगर पिकावर बोजा ठेवूनच काढावें लागणार. पीक कर्जाचा नवा प्रकार आतां सहकारी चळवळींत रूढ करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे व

त्याबाबत सरकार व सहकारी खातें यांजकडून जोरानें प्रचार चालू आहे. पीक कर्जाचा अनुभव फार अल्पकालीन आहे. कांहीं जिल्ह्यांत या कर्जाची रकम मोठी आहे तर कांहींत अजून लहान आहे. तेव्हां याबाबत आजच निर्विवाद मत बनविणें कठीण आहे. हें जरी खरें, तरी याबाबत बरेच सहकारी कार्यकर्ते ज्या शंका काढतात त्यांकडे लक्ष देणें जरूर आहे. ज्या कर्जास जमिनीचें तारण कांहीं अंशीं होतें अशांचीही वसूली अलीकडचीं कांहीं वर्षें सोडल्यास समाधानकारक होत नसे. थोडें दुर्लक्ष झालें तरी थक बाकी वाढे व मंदीच्या काळांत अगर लवादांत बरीच प्रकरणें गेल्यास जिंदगी भरपूर असूनही सोसायटयांचा कारभार जवळ जवळ स्थगित होई. या अनुभवाकडे पाहतां पीक कर्जाच्या वसुलीबाबत सहकारी मंडळयांच्या चालकांस भीति वाटल्यास नवल नाहीं. सालोसाल पूर्ण वसूली होण्यावरच पीककर्जाची पद्धति चालू राहण्याची शक्यता. सालोसाल पूर्ण वसूली महाराष्ट्रांतील शेतकींत कितपत शक्य आहे ? अर्थात् पीक कर्जाची मर्यादा फार आंखूड ठेवली तर गोष्ट निराळी, पण साधारण गरजेपुरतें कर्ज दिल्यास पिकांची पैदास व पिकांचे भाव हे दोन्ही जेथें अनिश्चित तेथें इच्छा असतांहि फेड करण्याची ऐपत व शक्यता दरवर्षी असेलच असें म्हणवत नाहीं. आणि एकदां पीक कर्ज थकलें म्हणजे सर्वच अनवस्था प्रसंग. तसेंच पीक कर्जाच्या सदरांत घातलेल्या सर्वच बाबी एका सालांत पूर्णपणें उत्पादक होवून परतफेडीचें सामर्थ्य वाढवतील अशा नाहींत. बीं, अगर खताबाबत केलेला हंगामी पिकावरचा खर्च सालाचे आंत परत निघावयास पाहिजे हें खरें. पण ज्या शेतीचें उत्पन्न वर्षाहून अधिक काळांत निघतें तिजबाबत अडचण होणार. तसेंच बैल, आउतें अशा बाबींकरितां कर्ज काढल्यास तें एका वर्षाच्या उत्पन्नांतून कसें फेडणार ? जोंपावेतों सावकार व सहकारी मंडळी या दोन्ही मिळूनच शेतकऱ्याची गरज भागतें असें मानलें जात होते तोंपावेतों हा तपशिलाचा विचार फार महत्वाचा नव्हता. पण सर्व गरज सोसायटीमार्फत भागावयाची म्हटल्यास तपशील अवश्य पाहिला पाहिजे. मोठ्या प्रमाणावर, सुरक्षित, बाजार भावांवर लक्ष ठेवून, एक किफायतशीर व्यवसाय म्हणून जेथें शेती चालते तेथें कर्जाची थोडया मुदतींत व्यवस्थित उलाढाल होईल असें धरतां येतें. पण जेथें दरसाल तर नव्हेच पण लांब मुदतीवरही जेमतेम तोंडमिळवणी होते तेथें इतक्या वक्तशीर व्यवहारावर अवलंबित असलेली पद्धती कितपत टिकेल याची शंका वाटते. महाराष्ट्रासारख्या अनिश्चित शेतीच्या प्रदेशांत जमीन अगर ती कसण्याचा हक्क यावरच शेतकऱ्याची पत अंतीं आधारलेली असावयाची. अशा परिस्थितींत निरनिराळया मुदतीचीं कर्जें व त्यांच्या निरनिराळया पद्धतीच्या परत फेडीच्या योजना असा पोकळ डोलारा उभारणें माझ्या मतें अयोग्य आहे. एकाच पद्धतीच्या संस्थांमार्फत शेतकऱ्यांस लागणारीं सर्व प्रकारचीं कर्जें पुरवून वाईट सालांत वसूली निश्चित घटणार हें लक्षांत धरूनच परतफेडीचा अंदाज बांधावा. निरनिराळया संस्थांत विभागलेला व्यवहार अशा प्रकारें होवूं शकणार नाहीं. हल्लींच्या पद्धतीनें परिणामी शेतकऱ्याचें नुकसानच होईल असें माझें मत आहे. ज्या प्रदेशांत जमीन महसुलाचे पद्धतींतही सूट व तहकुबीचें महत्त्व फार मानलें जातें, तेथें पीक कर्जाच्या वसुलींत वेळोवेळीं निदान तहकुबी द्यावी लागेल हें गृहीत धरणें प्राप्तच आहे.

पीक कर्जाचा विचार केला म्हणजे सावकारी व व्यापारी व्यवहाराची सांगड घाल-ण्याचा प्रश्न साहजिकच उद्भवतो. पीक कर्जाची वसुली बहुतांशीं ही सांगड नीट घालण्यावर अवलंबून आहे. छोटया प्रमाणावर भुसार मालाचें उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या माल-विक्रीवर देखरेख ठेवणें फार कठीण व त्याच्या पीक कर्जाची वसुली--विशेषतः यांतच बैलाकरितां लागणाऱ्या कर्जाचा समावेश झाला असल्यास–केव्हांही कांहींशीं दुरापास्तच होणार. पण जेथें पीक किफायतशीर, भरपूर व सुरक्षित तेथें सुद्धां कर्जवसुलीची सोय माल-विक्रीमधून परस्पर होणें हेंच आजकालच्या अनुभवावरून श्रेयस्कर समजलें जातें. केवळ सहकारी सावकारीची वाढ होऊन तादृश कांहीं फायदा नाहीं; त्याचे जोडीस खरेदी–विक्रीचा व्यवहारही वाढला पाहिजे हा सिद्धांत फार जुना आहे. या सिद्धांताची अलीकडील सुधारलेली मांडणी म्हणजे सहकारी चळवळीचीं हीं दोन्हीं अंगें सारखींच वाढून भागणार नाहीं तर तीं परस्परावलंबी व एकमेकांस प्रत्यक्ष पूरक आहेत अशीही योजना झाली पाहिजे. ही मांडणी अलीकडील सर्व समित्यांचे अहवाल, परिषदांचे ठराव इत्यादिकांतून समावेशलेली आढळते. हा सिद्धांत सर्वमान्य झाला आहे एवढेंच नव्हे तर युद्धकाळांत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मोठ्या प्रमाणांत अनेक प्रांतांतून झाली आहे, असें वारंवार म्हणण्यांत येतें. मद्रास प्रांतांतील प्रगति विशेष उल्लेखनीय समजली जाते; नुसते आंकडे पाहिले तर मुंबई प्रांतांतील वाढही भरीव वाटते. आज आपणांस मान्य सिद्धांत अगर गत वाढीचे आंकडे यांजकडे पाहावयाचें नसून ही उभारणी भक्कम पायावर झाली आहे किंवा नाहीं इकडे लक्ष द्यावयाचें आहे. सुरवातीस दर्शविल्याप्रमाणें सहकारी खरेदी-विक्री व्यवहाराची आजची वाढ सरकारी मदत व नियंत्रित व्यवहार यांमुळें केवळ घडून आली. ही मदत व हा व्यवहार निदान कांहीं वर्षें असा टिकेल व तोंवर या नवीन संस्था आपले पाय मजबूत रोवूं शकतील असा सहकारी कार्यकर्ते व अधिकारी यांचा समज होता. हा समज निराधार ठरला आहे व दोन महिन्यांत परिस्थितींत कल्पनातीत बदल होऊन या सहकारी संस्था आज उघड्या पडल्या आहेत. यांना कसें व कितपत सांवरतां येईल याचा भरपूर उहापोह आपल्या परिषदेंत होईलच. या प्रयत्नाच्या ठळक मर्यादा मी थोडक्यांत दर्शविणार आहें. मर्यादा दोन प्रकारच्या मानतां येतील. एकतर संस्थांचें आजचें बळ काय व दुसरें आजची परिस्थिति त्यांस कितपत अनुकूल आहे. संस्था फार दुबळ्या असल्यास नवीन घटनेंत परिस्थिति साधारण अनुकूल असूनही त्यांची फारशी प्रगति व्हावयाची नाहीं. पण या मुद्यावर मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. नवीन परिस्थिति मूलतः या संस्थांस कितपत मानवेल ही बाब खरी महत्त्वाची आहे. ही नवी परिस्थिति सरकारच्या पालटलेल्या धोरणानें निर्माण झाली आहे. नियंत्रित व्यवहार सोडून अनिर्बंध व्यवहाराचें तत्त्व निदान व्यापाराचे बाबतींत हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलें आहे. व्यापारी नियंत्रण फारसें प्रांतिक सरकारच्या कक्षेंत येत नसल्यामुळें प्रांतिक सरकारला हीं व्यापारी नियंत्रणें काढणें भाग पडलें आहे. अर्थात् ही गोष्ट कांहीं प्रांतिक सरकारांनीं कांहींशीं नाखुषीनें केली असेल, परंतु सर्व प्रांतिक सरकारांनीं साकल्यानें विचार करून नवीन धोरण मान्य केलें आहे असें म्हणणें आज प्राप्त आहे. कारण प्रश्न अत्यंत महत्त्वाचा, सर्व आर्थिक जीवनाच्या रचनेचा असूनही, कोणी प्रांतिक मंत्री [illegible] झाले नाहीत.

- नियंत्रित व्यवहार व नियोजित आर्थिक प्रगति यांचे अन्योन्यसंबंध निकटचे आहेत व सहकारी संस्थांचा स्वखुषीच्या व्यवहारावर कटाक्ष असला तरीही सहकारी प्रगति व नियोजित अर्थव्यवस्था परस्परविरोधी नाहींत असेंच प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचें मत आहे. भांडवलशाहींतील खुल्या व्यवहाराबद्दल सार्वराष्ट्रीय सहकारी चळवळीचें मत सार्वराष्ट्रीय सहकारी समितीच्या अहवालांतील खालील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल. " स्वातंत्र्याचे सबबीखालीं राष्ट्रीय किंवा सार्वराष्ट्रीय व्यवहाराचीं मुख्य सूत्रें मोठ्या भांडवलदारांच्या हातीं देण्यास सहकारी कार्यकर्त्यांचा विरोध आहे. तसेंच ज्या मोठ्या भांडवलदारांचें उद्दिष्ट खाजगी नफा आहे त्यांचा व्यवहार व केवळ जनसेवेसाठीं निर्माण झालेल्या लहान-मोठ्या सहकारी संस्था यांचा व्यवहार या दोहोंमधील मूलभूत फरकाची दखल सरकारी धोरणांत घेतलेली जेव्हां दिसत नाहीं तेव्हां याचें त्यांना सखेदाश्चर्य वाटतें."
I. L. O.: Co-operative Movement and Present-Day Problems (1945) पृ. १८७
आपल्या दृष्टीनें याहूनही महत्त्वाचा अभिप्राय सरैय्या समितीचा. आपल्या अहवालाच्या पहिल्या प्रकरणांत सरैय्या समितीनें सहकारी संस्थांच्या यशस्वितेला आवश्यक पार्श्वभूमि कल्पिली आहे. सहकारी चळवळीच्या वाढीस अनुकूल परिस्थितीचीं तीन लक्षणें समितीनें सांगितलीं आहेत. एक लोकशाही सरकार आणि दुसरें शैक्षणिक प्रगति; पण सर्वांहून महत्त्वाचें, विशेष विस्तारानें व आग्रहानें मांडलेलें तिसरें लक्षण, अनिर्बंध व्यवहाराचा शेवट व शेतीमालाच्या किंमती इत्यादींबाबत सरकारचा सक्रिय पाठिंबा. सरैय्या समितीचा याविषयींचा परिच्छेद आजच्या परिस्थितींत इतका महत्त्वाचा आहे कीं त्याचें समग्र भाषांतर मी येथें उद्धृत करितों.

" हिंदुस्थान सरकारनें आजवर अवलंबिलेल्या व हिंदुस्थानच्या राहणीचें मान वाढविण्यास असमर्थ ठरलेल्या खुल्या व्यापाराच्या धोरणाचा शेवट झाल्याखेरीज नियोजन शक्य नाहीं. म्हणजेच सरकारनें शिक्षण, वहातुक, आरोग्य, शेती, उद्योगधंदे इत्यादि क्षेत्रांत व्यापक प्रमाणावर कार्य हातीं घ्यावयास हवें. आजच्या परिस्थितींत खाजगी व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व औद्योगिक योजना हातीं घेण्यांत बराच धोका पत्करावा लागत असल्यानें केवळ त्यावरच अवलंबून राहून चालणार नाहीं. सहकारी संघटनेचा अर्थच हा कीं पत्करावयाचा धोका व जबाबदारी विभागणीच्या पद्धतीनें कमी करणें. परंतु हें करण्याची संघटकाची शक्ति बरीच मर्यादित आहे. म्हणून आर्थिक व्यवहारांत खाजगी व्यक्तींना पत्करावा लागणारा धोका, त्यांना सहज अंगावर घेतां येईल इतका कमी करणें हें सरकारचें कर्तव्य आहे व यासाठीं सरकारनें आर्थिक प्रश्नांत लक्ष घालून आवश्यक ते उपाय योजिले पाहिजेत. उत्पादनाच्या सर्वच क्षेत्रांत धोका आहे हें खरें, परंतु शेतींत तर त्याचें प्रमाण विशेषच जास्त असतें. याला अनेक कारणें आहेत. पावसाचा भरंवसा नाहीं, उत्पादन मागणीनुसार चटकन् कमीजास्त करितां येत नाहीं, लहान प्रमाणावर शेती करणाऱ्यांची फार मोठी संख्या, व बाजारभावांतील विलक्षण चढउतार. शिवाय शेती उत्पादनाच्या बाजारभावांतील चढउतारीचा एकंदर देशाच्या आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम होतो. कारण सत्तर टक्क्यापेक्षां जास्त लोकसंख्येच्या उत्पन्नावर व त्यामुळें बहुतेक सर्व वस्तूंच्या मागणीवर यांचा परिणाम होतो. राहणीच्या मानावर व कच्च्या मालाच्या किंमतीवर होणाऱ्या या चढउतारांच्या

परिणामामुळें औद्योगिक उत्पादनाच्या किंमतींनाही झळ लागल्याशिवाय रहात नाहीं. शेती उत्पादनाच्या किंमतींत मंदी झाल्यास शेतकऱ्यांची परिस्थिति विशेषच वाईट होते. जर पुढील कांहीं वर्षांत येणारी मंदी टाळावयाची असेल, एकंदर आर्थिक व्यवहारांत स्थैर्य आणावयाचें असेल, उत्पादन, व्यापार व शेतीच्या मालाच्या रूपांतरांतील व्यवहारांत पत्कराव्या लागणाऱ्या धोक्याचें प्रमाण सुसह्य करावयाचें असेल व सहकारी चळवळीनें खाजगी उद्योगधंद्यांशीं चढाओढींत टिकून रहावयाचें असेल तर, सरकारनें शेतकरी व गिऱ्हाईक या दोहोंनाहि न्याय्य वाटेल अशा ठराविक प्रमाणांतच शेतकी उत्पादनाच्या बाजारभावांत चढउतार होतील यासाठीं कसून प्रयत्न केला पाहिजे. सहकारी चळवळीचें यश झपाट्यानें आर्थिक प्रगति करण्याकरितां सरकारनें स्वीकारलेल्या धोरणावरच अवलंबून राहील. " ( पृ. ६–७ )

आजची निर्माण झालेली परिस्थिति भयावह आहे असें वारंवार आग्रहानें मी कां म्हणत असतो हें वरील उताऱ्यांत केलेल्या समर्पक विवेचनावरून स्पष्ट लक्षांत येईल. सहकारी संस्था रुजण्यास व वाढण्यास जो निवारा पाहिजे तो आतां पूर्णपणें नाहींसा झाला आहे. आर्थिक तेजी मंदीच्या झंझावातांत आपण तगून राहूं ही आशा फोल आहे. त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रासारख्या उजाड मुलुखांत तिला कांहींच धर नाहीं. गुजराथेसारख्या नजीकच्या प्रदेशाशीं तुलना केली असतांही आपली आजची परिस्थिति फार खराब आहे असें आढळून येईल. शेती असुरक्षित व अल्प फायद्याची, शेतकरी अज्ञानी व गैरहिशेबी, मूळची फुटीर वृत्ति त्यांतच सावकार व व्यापारी आमच्या समाजाशीं समरस न झालेले आणि म्हणून विशेष आक्रमक, अशा परिस्थितींत खरेदी–विक्री संघ टिकून राहतील. शेती मालाचा व्यापार सहकारी संस्थांचे हातीं जो थोडाबहुत आला आहे तो कायम राहील हें संभवत नाहीं.

अनिर्बंध व्यवहारांत केवढे मोठे धोके निर्माण होतात हें आजच्या गुळाच्या उदाहरणावरून दिसतच आहे. आमच्या सरकारला दिव्य दृष्टि प्राप्त होऊन त्यांनीं लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं व्यवहार खुला केला; पण त्याबरोबर खुला व्यवहार साधारण नीट चालण्यासही जी परिस्थिति अवश्यक आहे ती निर्माण करणें त्यांस साध्य झालें नाहीं. पेठेंत माल येऊं लागला पण त्याचा उठाव नाहीं. सर्व कोठारें भरलीं तरी परगांवीं पाठविण्याची सोय कांहींच नाहीं. किंमती दोन आठवड्यांत भलतीकडे उतरल्या व माल मातीमोल झाला तरी त्याबद्दल दाद नाहीं. ही परिस्थिती अपवादात्मक मानावयाची नाहीं. ही भविष्यांतील नित्याची होण्याचा धोका आहे. खुल्या व्यापारांत दोन पैसे मिळाल्यामुळें तात्कालिक बरें वाटत असणाऱ्यांनीं गुळाच्या शेतकऱ्याची सद्यःस्थिति जरूर लक्षांत आणावी. अर्थात् परिस्थितीचा धोका खाजगी व्यापारी व सहकारी संस्था या दोहोंस सारखाच आहे हें खरें, परंतु खाजगी व्यापाऱ्यास उपलब्ध असलेलें भांडवल व मार्ग सहकारी संस्थांस उपलब्ध नाहींत. आणि खरा महत्त्वाचा विचार म्हणजे व्यवस्था कोणती शाश्वत राहणार याबाबतचा. खाजगी व्यापारी धोका पत्करून व्यक्तिशः कोणी बुडले अगर तरले तरी व्यवस्था खाजगी व्यवहाराचीच राहते व जितका धोका अधिक तितकी अडत्याची दलाली अधिक या न्यायानें धोका पत्करणाऱ्या भांडवलदार व व्यापाऱ्यांचे हातीं दिवसेंदिवस जास्त संपत्तीचा व सत्तेचा संचय होतो. याच्या उलट न्याय

सहकारी संस्थांस लागू असतो. त्यांच्यापैकी डोकें वर काढूं पाहत असलेल्या एका दोषाची जरी पीछेहाट झाली तरी परिणाम सर्वांवरच होतो. सहकारी संस्था काढणें व चालविणें हें मूलतःच अनिर्बंध व्यवहारी समाजांत धारेविरुद्ध पोहण्यासारखें आहे. त्यांतच लाटा मोठ्या, भोंवरे अनेक, हिंस्र जलचरांची गर्दी म्हणजे पैलतीर गांठणारा भाग्यवानच समजावयाचा.

शेतमालाचा व्यापार सहकारी संस्थांचे हातीं आला नाहीं अगर राहिला नाहीं म्हणजे त्याचा परिणाम सावकारी व्यवहारावरही खचित होणार. पीक कर्जे तर राहोतच पण पूर्वीचा सावकारी व्यवहारही पूर्वीइतका टिकून राहणें शक्य नाहीं. म्हणजे जुन्या काळाप्रमाणेंच तेजीचा फायदा अशाश्वत, आळवावरील पाण्याप्रमाणें, मंदीच्या वेळचा बुडता पाय मात्र दर खेपेस जास्त खोल जाणार अशी स्थिति राहणार. यांतच नवीन कायद्यांच्या परिणामांची भर. आजचेंच धोरण कायम राहिल्यास आणखी चार पांच वर्षांत मराठी शेतकऱ्याच्या वरचा कर्जाचा बोजा १९३५-३६ सालइतकाच निदान पूर्ववत झाला आहे व तो जमिनीवरचे हक्क अधिकाधिक गमावून स्वतःच्याच राज्यांत (!) परका ठरूं पहात आहे असें घडून आल्यास मला तरी बिलकुल आश्चर्य वाटणार नाहीं.

असो, विवेचन लांबविण्याचें कारण नाहीं. माझे मतें आजच्या परिस्थितींत सहकारी उत्पादक व व्यापारी संस्थांचा व्यवहार टिकून राहणें दुरापास्त आहे. अर्थात् सहकारी सावकारी व सहकारी व्यापार यांची फलदायी सांगड घालून सर्व सहकारी संस्था शाश्वत पायावर उभारणें हेंही अशक्य. ब्रिटिश अमदानी असो कीं स्वराज्य येवो अनिर्बंध व्यवहाराचें तत्वज्ञान राज्यकर्त्यांस सारखेंच मानवतें, आणि म्हणून आमच्या सहकारी संस्था या राष्ट्रीय व्यवस्थेचा गाभा नसून पूर्वीप्रमाणेंच एका दिखाऊ चळवळीचें अंग आहेत असेंच मानलें पाहिजे. माझा सूर फाजिल निराशेचा आहे, असें आपणांपैकीं बरेच जणांस वाटेल हें मी जाणतों. मी आपणांकडून आग्रह व अत्युक्ति हीं दोन्ही टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

आजचें हल्लींचें सरकारी धोरण कायम आहे तोंपावेतों सहकारी संस्थांची पायाशुद्ध उभारणी अशक्य व त्यांच्याकडून शाश्वत कार्य कांहीं होणार नाहीं हा वरील विवेचनाचा निष्कर्ष आहे. यामुळें सहकारी पुनर्घटनेचा व नियोजनाचा विचार करण्याचे ऐवजीं त्यांसाठीं लागणारी आवश्यक पूर्वस्थिति अस्तित्वांत आणणें हाच खरा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. माझें भाषण संपविण्यापूर्वी सरकारी धोरण कसें बदललें पाहिजे व सहकारी नियोजनाच्या एकंदर प्रश्नाबद्दल आपली दृष्टि काय असावी याबद्दलचीं माझीं मतें मी थोडक्यांत आपणांपुढें मांडणार आहे. अनिर्बंध व्यवहार ही प्रकृति व नियंत्रण ही विकृति हें सरकारी धोरणाचें आजचें सूत्र दिसतें. सरय्या समितीनें या धोरणाचा स्पष्टपणें निषेध केला आहे, तसाच सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी तो केला पाहिजे. तसेंच सहकारी संस्था व खाजगी व्यापारी व भांडवलदार यांच्या व्यवहारांतील खरा फरक सरकारनें ओळखून तो आपल्या धोरणांत ठळक रीतीनें दाखविला पाहिजे, याचीही आपण आग्रहानें मागणी केली पाहिजे. या सर्वसाधारण बाबी

झाल्या. यापुढें जाऊन महाराष्ट्रांतील सहकारी संस्थांच्या दृष्टीनें सरकारी धोरणाचा मूळ पाया कसा बसवावा याबद्दलही आपण विचार केला पाहिजे. शेती मालाच्या किंमतीस स्थैर्य लाभावें व व्यापारी पद्धतीमुळें शेतकरी लुबाडला जाऊं नये हें उद्दिष्ट कोणासही पटेल. हें महाराष्ट्रापुरतें साधण्याचा एकच मार्ग म्हणजे शेती मालाचा घाऊक व्यापार, त्याचा सांठा व त्यावरील प्राथमिक क्रिया यांचें राष्ट्रीयकरण, असें माझें मत पूर्ण विचारांतीं बनलें आहे. राष्ट्रीयकरण हा शब्द खाजगी नफ्यासाठीं होत असलेल्या व्यवहाराचें पूर्ण उच्चाटन होऊन विवक्षित क्षेत्रांतील सर्व व्यवहार समाज नियंत्रणाखालीं येणें या क्रियेस उद्देशून मी वापरीत आहे. या दृष्टीनें युद्धकाळांत अनेक प्रकारच्या व्यापारांचें व व्यवहारांचें राष्ट्रीयकरण झालें होतें. राष्ट्रीयकरण सर्वांशीं सहकारी संस्थांच्या सहाय्यानें होणें शक्य आहे, एवढेंच नव्हे तर इष्टही आहे. शेती मालाच्या भावांत वारंवार अगर मोठा फेरबदल न होऊं देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य समजल्यास शेती मालाची खरेदी, सांठा, रूपांतर व पुढें क्रमानें शेती मालाची कमी अधिक विक्री यांची जबाबदारी सरकारवर येते. ही जबाबदारी पार पाडण्यास सहकारी संस्था हें एकच प्रभावी व समाजहितपोषक साधन आहे. सरकारनें घालून दिलेल्या किंमतीच्या मर्यादेंत सहकारी संस्थांनीं सर्व शेत मालाची खरेदी करावी, सरकारी सहाय्यानें बांधलेल्या कोठारांत या मालाचा आवश्यक संचय इष्ट काळापर्यंत करावा, ज्या कच्च्या मालाचें कांहीं रूपांतर आवश्यक आहे तें यंत्रसहाय्यानें किंवा इतर मार्गानें घडवून आणावें आणि यथाक्रम त्याच्या विक्रीची व्यवस्था करावी. यापैकीं कोणत्याच व्यवहारांत खाजगी व्यापाऱ्याचा शिरकाव होणें अत्यंत अनिष्ट आहे. शेती मालाच्या व्यापारांतील खाजगी नफेबाजीचें स्थान हेंच माझ्या मतें मराठी शेतकऱ्यांचें दारिद्र्य व विघटना यांचें खरें कारण आहे. शेतमालाच्या किंमतीची हंगामांतील घट व तो पूर्णपणें व्यापाऱ्यांचे हातांत गेल्यावर भावांत होणारी मोठी वाढ हें वार्षिक चक्र खाजगी व्यापाऱ्यांस जोपर्यंत या व्यवहारांत स्थान आहे तोंपर्यंत थांबणार नाहीं. एका विवक्षित कालांतच सर्व शेतीमाल बाजारांत येतो याचा अनिष्ट परिणाम घालविण्यास मालकोठारांची तरतूद झाली पाहिजे. परंतु हीं मालकोठारें सरकारचे किंवा सहकारी संस्थांचे ताब्यांत राहिलीं तरच या योजनेचा खरा फायदा शेतकऱ्यांस होईल. नाहींतर इतर सरकारी योजनांप्रमाणें त्यामुळें खाजगी व्यापाऱ्यांचाच नफा जास्त वाढेल. हल्लीं मुंबई सरकारतर्फें जी कोठारयोजना पुढें मांडण्यांत आली आहे त्यांतील याबाबतचें धोरण अनिश्चित व गुळमुळीत वाटतें. नवीन सर्व कोठारें सरकारी मदतीनें बांधण्यांत येऊन तीं सर्व सहकारी संस्थांचे ताब्यांत देण्यांत येतील व एकादे वेळेस सहकारी संस्था उपलब्ध नसल्यास त्यांची व्यवस्था सरकारमार्फत होईल असें स्पष्ट धोरण सरकारनें स्वीकारणें अत्यावश्यक आहे. हाच न्याय शेतीमालाचें रूपांतर करणाऱ्या अनेक व्यवसायांना लागतो. सडणें, दळणें, फोडणें इ. अनेक क्रिया करणाऱ्या व्यावसायिकांचें स्थान शेतीच्या अर्थव्यवस्थेंत फार महत्त्वाचें होऊन बसलें आहे. कांहीं अंशीं कोठारी व व्यापारी या दोहोंची भूमिका हे स्वीकारतात. अनेक टापूंत व व्यवसायांत यांची संख्या विशेष वाढलेली असूनही एकमेकांशीं संगनमत करून यंत्रसामुग्री बंद ठेवून आपलीं उत्पन्नें हे फाजील वाढवितात अशीं यांज-

बद्दल तक्रार आहे. याबाबतही सहकारी संस्था कार्यक्षम बनूं शकतात, परंतु अनिर्बंध व्यवहारांत त्यांना डोकें वर काढणें दुरापास्त आहे हाच आजवरचा अनुभव आहे. कोठारें व शेतीमालाचें रूपांतर करणारे कारखाने यांची संख्या व स्थलनिश्चिति या गोष्टी बहुतांशीं पिकांचे क्षेत्रावर अवलंबून असतात. पिकांच्या क्षेत्राबद्दलची परिस्थिति वारंवार बदलणारी नसते यामुळें यांची तरतूद व वाढ हीं खाजगी व्यक्तींच्या हातीं न ठेवतां तीं नियोजित करणें हेंच सोय व खर्च या दोन्ही दृष्टीनें योग्य आहे. एवंच, अडाणी व गरीब शेतकऱ्यास धूर्त व संपन्न खाजगी व्यावसायिकांच्या कचाट्यांतून सोडविणें व वहातूक व यांत्रिक साधनांचा यथायोग्य उपयोग होणें या दोन्ही दृष्टीनें या सर्व क्षेत्रांचें राष्ट्रीयिकरण झालें पाहिजे. ज्यावेळीं हा साधा व शुद्ध विचार राज्यकर्त्यांस पटेल तेव्हांच आपल्या समाजास स्थैर्य लाभेल व सहकारी संस्थांचें कार्य भरीव होईल व टिकून राहील.

सरकारच्या धोरणांत याप्रमाणें बदल घडवून आणण्याची खटपट करीत असतांनाच सरकारी नियोजन कार्यक्रमांत सहकारी संस्थांचें स्थान काय हेंही आपण स्पष्ट केलें पाहिजे. याबाबत सहकारी कार्यकर्त्यांची भूमिका अजून सुस्पष्ट नाहीं हें मीं वर दाखविलेंच आहे. नियोजित व्यवस्थेंत कार्य करावयाचें तर विवक्षित कार्यपद्धति व निश्चित केलेले इष्टांक गांठण्याची तयारी व जबाबदारी आपणांस पत्करली पाहिजे. बिगर सभासदांशीं व्यवहार करणें व सभासद नांवापुरते करून घेणें इत्यादि गोष्टी आपण आधींच करूं लागलों आहों. पण याही पलीकडे जावून बदलत्या परिस्थितनुसार आपल्या कार्याच्या अंतिम उद्दिष्टांबद्दलच्या कल्पनाही आपण नव्या मांडल्या पाहिजेत. अगदीं थोडें कां होईना पण पूर्णपणें स्वतंत्र व स्वेच्छेनें घडून आलेलें कामच खरें महत्त्वाचें या जुन्या कल्पनेचा त्याग करून, सबंध समाजाचें परिवर्तन—आर्थिक व नैतिक—घडवून आणण्यांत मोठा भाग उचलण्याची आज केवढी निकड आहे, याची जाणीव आपण दाखविली पाहिजे. आज सोंवळी वृत्ति सोडून, व्यापक व लोकसंग्राहक दृष्टि स्वीकारणें अगत्याचें आहे. प्रत्येक संस्थेनें आपल्या क्षेत्रापुरतें पाहून आपला स्वयंभूपणा टिकविण्याचा अट्टाहास न धरितां सहकारी संस्थांची सर्व व्यवस्थाच जास्त बळकट व कार्यक्षम कशी होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. कोणत्याही कार्यांत आपणांकडे माणसांची वाण फार भासते. तेव्हां नियोजित आर्थिक प्रगतीचें कार्य सरकारी, निमसरकारी अगर सहकारी कोणत्याही मार्गानें होवो, जी मूठभर अनुभविक माणसें दर टापूंत आहेत त्यांनींच त्याचा भार उचलला पाहिजे. हें कार्य शक्य तितकें सहकारी मार्गानें होणें इष्ट अशी आमची श्रद्धा आहे, विश्वास आहे. सहकारी कार्यकर्त्यांनीं आपण होऊन त्यांत मोठा भाग उचलला तर नियोजनास योग्य वळण लागेल हेंही उघड आहे. तेव्हां लोकशाहीच्या व सहकारी कार्यपद्धतीच्या तत्त्वांबाबत आग्रह धरूनही आर्थिक नियोजनाचे सांच्यांत बसविण्यास आवश्यक इतका त्यांत बदल करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. केवळ जुन्या सहकारी मांडणीच्या आग्रहास्तव आर्थिक प्रगतीचा सर्वमान्य मार्ग सोडणें शक्य किंवा इष्ट नाहीं. तेव्हां संकुचित वृत्तीनें, सोंवळेपणानें अगर स्वतःच्या संस्थेच्या स्वायत्ततेबद्दलच्या आग्रहानें आपण यावेळेस बाजूस राहिलों तर घरीं गंगा येऊनही तींत स्नान न करण्याचें करंटेपण आपण पत्करूं. असा अविचार महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांचे हातून होणार नाहीं याबद्दल मला भरंवसा वाटतो. सरकारनें योग्य तें धोरण स्वीकारलें, महाराष्ट्र जीवनाचा गाभा जो मराठी शेतकरी त्याच्या निश्चित, नियोजित उन्नतीची योजना आंखली म्हणजे सर्व पूर्वग्रह व संकुचित हितसंबंधाच्या कल्पना सोडून देऊन ही योजना यशस्वी करण्याकरतां महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्ते अहोरात्र झटण्यास उत्सुक आहेत अशी ग्वाही या परिषदेच्या कार्यानें सर्वांस मिळो, अशी इच्छा प्रकट करून मी आपलें भाषण संपवितों.

# परिषदेंत मंजूर झालेले ठराव

## ( १ ) औद्योगिक विभाग

१. महाराष्ट्र विभागांत ग्रामीण व लहान लहान स्थानिक उद्योगधंद्यांची सहकारी तत्त्वावर वाढ व्हावी म्हणून योग्य त्या त्या ठिकाणीं विणकर, कुंभार, लोहार, सुतार, कासार, चर्मकार, तेली इत्यादि कारागीर मंडळींच्या सहकारी संस्था स्थापण्याचा फार जोरानें प्रयत्न करण्यांत यावा अशी या परिषदेची सरकारास व चळवळींतील बिनसरकारी कार्यकर्त्यांना विशेष आग्रहाची विनंति आहे. हें प्रचाराचें काम सुकर व्हावें व स्थापन होणाऱ्या औद्योगिक सहकारी संस्थांस वेळोवेळीं येणाऱ्या अडचणी शक्य तितक्या लवकर दूर करण्याचे दृष्टीनें सोयीचें व्हावें म्हणून ज्या ज्या जिल्ह्यांत अद्याप स्थापन झाले नसतील तेथें तेथें जिल्हा औद्योगिक सहकारी संघ शक्य तितक्या लवकर स्थापन करण्याची सहकारी खात्यानें व्यवस्था करावी अशी या परिषदेची विनंति आहे.

२. सरकारला व स्थानिक स्वराज्य संस्थांना लागणारा पक्का औद्योगिक माल जर या सोसायट्या तयार करीत असतील तर तो या सोसायट्यांकडूनच त्यांनीं विकत घ्यावा. तसेंच औद्योगिक सोसायट्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या व त्यांनीं तयार केलेल्या पक्क्या मालाच्या रेल्वेवहातुकीस वरिष्ठ दर्जाचें अग्रत्व (प्रायारिटी) मिळावें. त्याचप्रमाणें या सोसायट्यांकडून उत्पादन करण्यांत येणारे मालांत गरजेप्रमाणें जरूर ती सुधारणा करण्याचे दृष्टीनें त्या त्या धंद्यांचे तज्ज्ञ अधिक नेमावेत अशी या परिषदेची सरकारला विनंति आहे.

३. ज्या ज्या भागांत विणकर सोसायट्या आहेत किंवा जिल्हा सहकारी औद्योगिक संघ आहेत त्या त्या संस्थांमार्फतच त्या त्या भागांतील सूत वाटपाचें काम करण्यांत यावें अशी या परिषदेची शिफारस आहे.

४. औद्योगिक सोसायट्यांची प्रगति योग्य मार्गानें होण्याकरितां त्यांचे व्यवहारावर दक्षतापूर्वक देखरेख ठेवण्यासाठीं स्वतंत्र सुपरवायझर यांची जरूरी आहे. या सुपरवायझरां प्रित्यर्थ होणारा खर्च सरकारनें सोसावा. सुपरवायझरांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं खालीलप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यास असलेल्या औद्योगिक असोसिएशनला संलग्न असलेली अशी एक "ॲडहॉक" कमिटी असावी. ही "ॲडहॉक" कमिटी खालीलप्रमाणें असावी.

(१) प्रॉ. औद्योगिक संघाचा एक प्रतिनिधी.

(२) जिल्हा औद्योगिक संघाचा एक प्रतिनिधी.

(३) जॉइंट रजिस्ट्रारसाहेब फॉर इंडस्ट्रियल को. ऑ. ॲण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज यांचा एक प्रतिनिधी.

(४) त्या भागाचे असि. रजिस्ट्रारसाहेब.

(५) पैसा पुरविणारे संस्थेचा एक प्रतिनिधी.

टीपः--ज्या ठिकाणीं जिल्हा औद्योगिक संघ नसेल तेथें त्या भागांतील औद्योगिक सोसायट्यांनीं प्रतिनिधी नं. २ निवडावा.

५. वरील प्रकारच्या औद्योगिक सोसायट्यांची सर्वांगीण वाढ होण्यासाठीं व त्यांचे कार्यास मदत व्हावी म्हणून जिल्हानिहाय औद्योगिक बँका स्थापन कराव्यात व ते शक्य नसल्यास महाराष्ट्र विभागासाठीं एक औद्योगिक बँक काढावी. अशा बँकांनीं शेअर्स व डिबें· चर्स रूपानें भांडवल उभारावें. डिबेंचर्स रूपानें उभारलेल्या भांडवलाचें मुद्दल व व्याज यांची हमी सरकारनें द्यावी अशी या परिषदेची सरकारला विनंति आहे.

६. यंत्रसहाय्यानें अगर इतर मार्गानें शेतीमालाचें रूपांतर किंवा पक्का माल तयार करण्याचे कारखाने काढणाऱ्या उत्पादकांच्या सहकारी योजनांचा स्वीकार सरकारकडून कोणत्याही धोरणाच्या अगर तांत्रिक अडचणी बाजूस सारून त्वरेनें करण्यांत यावा व त्यास लागणारें सर्व प्रकारचें सहाय्य सरकारनें द्यावें अशी या परिषदेची आग्रहाची मागणी आहे.

७. ठराव नंबर ३ मध्यें सांगितलेली व्यवस्था सुतावरचें नियंत्रण कायम असेपर्यंत सोईस्कर होईल. पण हें नियंत्रण काढून घेतल्यावर सरकारनें विणकर सोसायट्यांच्या सभासदांस पुरेल इतका सुताच्या उत्पादनाचा ठराविक भाग गिरण्यांना राखून ठेवण्यास भाग पाडलें पाहिजे व तो त्यांनीं सोसायट्यांमार्फत वांटपाकरितां सुताच्या उत्पादन किंमतीवर अगदीं थोडा नफा घेऊन विकला पाहिजे अशी या परिषदेची आग्रहाची शिफारस आहे.

## (२) शेतकी विभाग

८. शेतकी सोसायट्यांच्या सभासदांनीं सोसायटींचें कर्ज पूर्णतः अगर अंशतः, शेतीचे चालू खर्चाकरितां घेतलें असेल त्या कर्जाचा प्रथम बोजा त्यानें उत्पन्न केलेल्या पिकांवर राहील अशी कायद्यांत तरतूद करण्यांत यावी अशी या परिषदेची सरकारला विनंति आहे.

९. ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनचें काम या प्रांतांतील सहकारी चळवळीनें हातीं घ्यावें असें या सभेचें मत आहे. हें काम व्यवस्थित व सूत्रबद्ध करण्याकरितां मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची, मुख्यतः जिल्हा बँकांची संघटित बँक अशा तऱ्हेची पुनर्घटना करावी व या पुनर्घटित प्रांतिक बँकेकडून जिल्हा मध्यवर्ती बँकांचें मार्गदर्शन व्हावें. हें काम यशस्वी होण्याकरितां लागणारें आर्थिक व इतर सहाय्य प्रांतिक व इतर सहकारी संस्थांना सरकारनें पूर्णपणें द्यावें.

१०. जिल्हा बँकांतील इन्स्पेक्टर कमी करण्याचे धोरणाशीं ही सभा सहमत नाहीं

११. व्याजाचे दर कमी व्हावे या उद्देशानें स्थानिक मुदतीच्या ठेवी मिळविण्याचे जास्त प्रयत्न शेतकी पतपेढ्यांनीं करावे अशी ही सभा त्यांस प्रेरणा देत आहे.

१२. सहकारी बँकांच्या कार्यक्षेत्रांत, सहकारी संस्थांस कर्जे या प्रमुख कार्याबरोबरच इतर व्यापारी बँका करीत असलेले सर्व व्यवहार—पैशाची ने-आण, कर्जरोखे खरेदीविक्री, इत्यादि सभासदांसाठीं करणें हें पूर्णपणें घेतात असें या परिषदेचें मत आहे व त्याकरितां व्यापारी बँकांस मिळत असणाऱ्या सर्व सवलती सरकार, रिझर्व्ह बँक, इत्यादिकांनीं सहकारी बँकांना देणें हें त्यांचें कर्तव्य आहे असें या परिषदेचें मत आहे.

१३. सहकारी चळवळीची विशेष वाढ आहे एवढ्याच कारणासाठीं कांहीं तालुक्यांत तगाई देण्यावर घातलेले निर्बंध काढून टाकावेत अशी या परिषदेची शिफारस आहे.

१४ ( अ ) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक समता प्रस्थापित होणें जरूर आहे. हें ध्येय दृष्टीपुढें ठेवून समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पुनर्घटनेच्या योजना आखणें जरूर आहे. या योजनांमध्यें सहकारी संस्थांच्या पुनर्घटनेला प्राधान्य असणें अवश्यक आहे.

( आ ) सहकारी संस्थांच्या पुनर्घटना—योजनांची आंखणी व प्रगति या सर्वांगीण सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पुनर्घटनेवर अवलंबून असून सर्व दिशांनीं प्रगति एकसमयावच्छेदेंकरून झाल्याखेरीज सहकारी पुनर्घटनेचें पाऊल पुढें फारसें पडणें शक्य नाहीं असें या परिषदेचें मत आहे. सहकारी पुनर्घटनेची आवश्यक पूर्वतयारी म्हणून सरैय्या समितीनें निर्देशिलेल्या विशेषत: शेती मालाच्या किंमतीबाबतचे आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करणें व सहकारी नियोजनाबद्दलच्या सहकारी पत्रकांत उल्लेखिलेल्या शेतकी मालाच्या व्यापारांतून खाजगी नफेबाजीचें उच्चाटन या उद्दिष्टाचा सक्रिय पुरस्कार सरकारनें करणें अत्यावश्यक आहे. पुनर्घटनेस आवश्यक असलेली पूर्वस्थिति निर्माण झालेली नसतांनाच, त्याबाबत सरकारनें आर्थिक व इतर प्रकारचें सहाय्य देण्याची निश्चित हमी दिली, नसतांनाच पुनर्घटना—योजना हातीं घेतल्यास वेळेस पुनर्घटित संस्थेची अपेक्षित प्रगति होणेचे ऐवजीं एकंदर चळवळीची पिछेहाटच होईल अशी सकारण भीति या परिषदेस वाटते.

## ( ३ ) नागरी विभाग

१५. "अ" व "ब" वर्गातील अर्बन बँकांना त्यांच्या कर्ज-व्यवहारांत त्यांनीं कानू ८. प्रमाणें उभारलेल्या खेळत्या भांडवलापैकीं आज संमत असलेल्या धोरणास अनुसरून जास्तींत जास्त ५० ते ६० टक्के इतकी रक्कम गुंतवितां येते. परंतु जर इतकी सर्व रक्कम कर्ज-व्यवहारांत गुंतविली नसेल तर शिल्लक रकमेची गुंतवण सहकारी कायद्यांतील ३७ व्या कलमाचें बंधन न रहातां बोर्डाचे मर्जीनुरूप योग्य त्या तारणावर करण्याची मोकळीक रहावी अशी सहकारी कायद्यांत दुरुस्ती करण्याबद्दल सरकारकडे शिफारस आहे.

१६ एखाद्या भौगोलिक विभागांत कार्य करीत असणाऱ्या सहकारी संस्थांच्या व्यवहारावर आक्रमण न करतां मे. रजिस्ट्रारसाहेब पसंत करतील त्या अर्बन बँकांना त्यांचे कार्यक्षेत्र त्यांच्या ठिकाणापासून दहा मैलांचे तृज्येस वाढवितां येऊन आपल्या शाखांमार्फत त्यांना लोकांच्या गरजा भागवितां याव्यात अशी व्यवस्था व्हावी. तसेंच अर्बन सहकारी चळवळीची वाढ व्हावी म्हणून जिल्ह्यांतील ज्या तालुक्याचे ठिकाणीं अगर मोठ्या गांवीं अर्बन बँका स्थापन झाल्या नसतील तेथें अशा बँका स्थापन होईपर्यंत जिल्ह्यांतील अर्बन बँकांस आपल्या शाखा उघडण्यास परवानगी द्यावी अशी या परिषदेची शिफारस आहे.

१७. सेंट्रल व अर्बन बँकांच्या नोकरांना आपल्या नोकरीबद्दल स्थैर्य वाटावें व कामाकडे त्यांचें अधिक लक्ष लागावें म्हणून या बँकांना अशी विनंती आहे कीं, त्यांनीं नोकरांच्या नोकरीसंबंधीं मे. रजिस्ट्रार साहेब यांनीं सुचविलेल्या नियमांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून नियम करावेत व त्यांत त्याबद्दलच्या अटी, रजा, वेतन, प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅच्युइटि वगैरे बाबतची तरतूद शक्य तितक्या लौकर करावी.

१८. "अ" व "ब" वर्गाच्या अर्बन बँकांना त्यांचे हिशेब रजिस्ट्रारनें मंजूर केलेल्या पॅनेलपैकीं कोणाही रजिस्टर्ड ऑडिटर, किंवा सरकारी ऑडिटर, यांपैकीं कोणाही एकाकडून आपले हिशेब तपासून घेण्याची साधारण सभेचे ठरावानुसार मोकळीक रहावी; दोघांकडून सालोसाल हिशेब तपासून घेण्याची आवश्यकता यापुढें असूं नये.

१९. सर मणिलाल नानावटी कमिटीनें आपले अहवालांत प्रांतिक व जिल्हा बँकांचे शेतीच्या पुनर्रचनेंत जें स्थान कल्पिलें आहे त्याअन्वयें नागरी पतपेढ्या व बँकांनीं आपल्याकडील खेळते भांडवलापैकीं त्यांच्या जरूरीपेक्षां जास्त असणारी रक्कम जिल्हा व प्रांतिक बँका ( ज्यांच्याशीं त्या संलग्न असतील त्या संस्था ) मध्यें ठेवावी व असें झालें तरच प्रांतिक किंवा जिल्हा बँकांस वरील व्यवस्थेंत पैसा उभा करणें शक्य होईल असें म्हटलें आहे. नागरी संस्थांची मुंबई प्रांतांतील संख्या लक्षांत घेतां अशा रीतीनें निर्बंध घालण्यांत येणार असेल तर नागरी संस्थांचें महत्त्व लक्षांत घेऊन नागरी संस्थांस त्या संस्थांचे संचालक मंडळावर प्रतिनिधित्व देणें जरूर आहे. सर नानावटी कमिटीनें हल्लीं प्रांतिक बँकेवर नागरी बँकांना असलेल्या दोन प्रतिनिधींच्या संख्येंतही घट करून त्याऐवजीं एकच प्रतिनिधी असावा अशी शिफारस केली आहे ही गोष्ट या परिषदेस सर्वस्वी अमान्य आहे.

प्रांतिक व जिल्हा बँकांच्या ठेवी स्वीकारण्याच्या व्याजाचे दर व नागरी संस्थांतील ठेवींच्या व्याजाचे दर विचारांत घेतले तर नागरी बँकांना जास्त व्याजाचे दरानें पैसे ठेवीचे रूपानें घ्यावे लागतात असें दिसतें; व अशा व्याजाच्या जादा दरानें घेतलेले पैसे कमी दरानें प्रांतिक व जिल्हा बँकांकडे ठेवण्याचा निर्बंध असणें हितावह ठरणार नाहीं असें या परिषदेचें मत आहे. म्हणून, सर नानावटी कमिटीनें केलेल्या सूचनांचा विचार करून योग्य तो फेरबदल व्हावा अशी या परिषदेची शिफारस आहे.

## ( ४ ) हौसिंग विभाग

२०. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या गृहमंडळ्या अधिक कार्यक्षम व्हाव्यात तसेंच अशा प्रकारच्या मंडळ्या शहरांत, उपनगरांत व प्रांतांतील लहान-मोठ्या गावांत अधिक अधिक स्थापन होऊन त्यांचा जनतेस योग्य तो उपयोग व्हावा म्हणून या परिषदेची सरकारास खालीलप्रमाणें विनंती आहे :—

( अ ) सरकारी पडीत जमीनी सहकारी संस्थांस घर बांधण्याकरितां मोफत देण्यांत याव्या. घरें बांधण्यास लागणारी सोईची जागा खरेदी करणेस हल्लीं फारच किंमत पडत आहे. ही किंमत विशेषत: गेल्या ४–५ वर्षांत तर फारच वाढली आहे. सबब लढाईपूर्वी म्हणजे १९३७ सालीं या जागांना जी किंमत पडत असे ती व त्यावर गेलीं दहा वर्षे दरसाल दरशेंकडा दोन टकेप्रमाणें होणारें व्याज एवढ्या एकूण किंमतीस या जागा सहकारी गृहमंडळयांना सरकारनें खरेदी करून याव्यात अगर योग्य त्या किंमतीस त्या खरेदी करून फार लांब मुदतीनें या संस्थांना भाड्यानें याव्या. मात्र हें भाडें पडणाऱ्या किंमतीच्या दरसाल दरशेंकडा अडीच टके दरापेक्षां अधिक असूं नये.

( ब ) गृहमंडळयांना घरें बांधण्यासाठीं लागणारें कर्ज सरकारनें दरसाल दरशेंकडा ३ टके दर अगर हें कर्ज देण्यापूर्वी सरकारनें ज्या दरानें कर्ज उभारलें असेल त्या दरापेक्षां ½ टके कमी दर या दोहोंपैकीं जो दर कमी असेल त्या दरानें यावें, व कर्जाची परत फेड चाळीस वर्षांत करून घेण्यांत यावी व हें कर्ज घर आणि जागा यांच्या एकूण किंमतीच्या निदान शेंकडा ७५ टकेपर्यंत देण्यांत यावें अशी या परिषदेची सरकारास विनंती आहे.

( क ) घरें बांधण्यासाठीं लागणारा माल म्हणजे लोखंड, पोलाद, सिमेंट, लांकूड व विटा उघड्या बाजारांत नियंत्रित दरानें मिळूं शकत नाहींत. सबब सहकारी संस्थांना लागणारा माल नियंत्रित दरानें मिळवून देण्याची सरकारनें व्यवस्था करावी; तसेंच प्रांताचे वाट्यास येणाऱ्या मालापैकीं कांहीं प्रमाणांत सदर माल सहकारी संस्थांसाठीं राखून ठेवावा अशी या परिषदेची सरकारास विनंती आहे.

टीप:—या सवलतीचा फायदा जास्तीत जास्त गरीब जनतेस मिळावा. विशेषत: दरमहा रुपये द्वोनशेंहून जास्त उत्पन्न असेल त्यांस मिळूं नये, असें धोरण सरकारनें ठेवावें.

२१. सहकारी गृहमंडळयांचें काम अधिक कार्यक्षम व्हावें; त्यांचे कार्यांत एकसूत्रीपणा यावा, त्यांच्या अडी-अडचणींची दाद लवकर लागावी, म्हणून या संस्थांनी जिल्हानिहाय आणि प्रांतिक संघ (फेडरेशन्स) स्थापन करावेत अशी या परिषदेची त्या संस्थांना विनंती आहे.

२२. शहरांची वस्ती वाढल्यामुळें ज्या ठिकाणीं म्युनिसिपालिटीची सरहद्द वाढविण्यास सरकार परवानगी देईल तेथें त्या सरहद्दींत येणारी सर्व जमीन ही गांवठाण म्हणून समजण्यांत येऊन ती सारा माफीची म्हणून समजण्यांत यावी.

२३. टाऊन प्लॅनिंग क्षेत्रांत हाऊसिंग सोसायट्यांकरतां भरपूर क्षेत्र, मागणी असेल तितकें, राखून ठेवावें. या क्षेत्रांत प्लॉटचें किमान क्षेत्रफळ ४,००० फुटांचें असण्यास परवानगी द्यावी. ४,००० स्क्वेअर फुटांचे क्षेत्रांस ½ क्षेत्र बांधकामास वापरतां यावें व ६,००० स्क्वेअर फुटांपुढें ⅓ क्षेत्र बांधकामासाठीं वापरतां यावें अशी सवलत द्यावी.

२४. को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायट्यांस मार्गदर्शन करणारे "यु" लिफलेट आतां फार जुनें झालें आहे तें सुधारण्यासाठीं व लीजहोल्डमध्यें सुधारणा करण्यासाठीं सरकारनें एक कमिटी नेमावी अशी या परिषद्‌ेची मागणी आहे. सदर समितीचा निर्णय बाहेर पडेपर्यंत सोसायटीनें आपल्या सोईप्रमाणें सभासदांकडून भाटेपट्टे करून घ्यावे व ते रजिस्ट्रार-साहेब यांनीं मान्य करावेत.

२५. को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायट्यांकडून अर्ज येतांच रस्ते, पाणी, ड्रेनेज वगैरेची व्यवस्था करण्याची जबाबदारी तेथील म्युनिसिपालिटीनें पत्करावी व त्या सोई तावड-तोब करून द्याव्यात.

## ( ५ ) मार्केटिंग विभाग

२६. को–ऑपरेटिव्ह मार्केटिंगबाबत चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमण्याबाबत नानावटी कमिटीनें केलेल्या शिफारशींची सरकारनें शक्य तितक्या लवकर अंमलबजावणी करावी अशी या परिषद्‌ेची सरकारास विनंति आहे.

२७. फळफळावळ, भाजीपाला, वगैरे नाशवंत माल ज्या बाजारपेठांत विकला जातो, त्या पेठांत मार्केटिंग कायदा लागू करावा अशी ही परिषद् सरकारास विनंति करते.

२८. म्युनिसिपालिट्यांनीं स्थापन केलेल्या मंडईमध्यें अगर बाजारपेठांत खरेदी–विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांच्या उपयोगासाठीं कांहीं जागा अगर गाळे राखून ठेवण्यांत यावेत व ते गाळे या संस्थांना सवलतीच्या भाड्यानें देण्यांत येतील अशी व्यवस्था सरकारनें करणें जरूर आहे असें या परिषद्‌ेचें मत आहे.

२९. ( अ ) वेअर हौसेसच्या कायद्याची बजावणी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें व्हावी यासाठीं हें काम सहकारी खरेदी–विक्री संघांनीं हातीं घ्यावें व त्याकामीं जरूर ती मदत सरकारनें त्यांना द्यावी अशी या परिषद्‌ेची सरकारास सूचना आहे.

( ब ) हल्लीं ठिकठिकाणीं असलेलीं सरकारी कोठारें स्थानिक खरेदी–विक्री संस्थांना अगर इतर सहकारी संस्थांना त्यांच्या उपयोगाकरितां शक्य तितक्या सवलतीनें देण्यांत यावी अशी या परिषद्‌ेची सरकारास विनंति आहे.

(क) जेथें हें शक्य नसेल तेथें सहकारी संस्थांना कोठारें ( गोडाऊन्स ) बांधण्यास प्रोत्साहन मिळावें म्हणून त्यांना या कारणासाठीं पुरेसें कर्ज अत्यंत अल्प व्याजानें व लांब मुदतीच्या, हप्तेबंदीच्या फेडीच्या बोलीनें सरकारनें द्यावें. तसेंच अशीं कोठारें मध्यवर्ती व सोयीच्या ठिकाणीं बांधलीं जावींत, म्हणून त्या हद्दींत सरकारनें स्वतः जागा ॲक्वायर करून ती नाममात्र भाड्यानें त्या संस्थांना द्यावी, अशी विनंति ही परिषद् सरकारला करीत आहे.

३०. रेग्युलेटेड मार्केटच्या कमिटीवर त्या त्या क्षेत्रांतील सहकारी खरेदी–विक्री संस्थांचा एक प्रतिनिधी असावा अशी कायद्यांत व नियमांत दुरुस्ती करावी अशी या परिषदेची सरकारला शिफारस आहे.

३१. मालावरील नियंत्रणें उठवित असतांना वांटपाचें काम करणाऱ्या सहकारी संस्थांना नियंत्रणें उठविल्यामुळें त्यांच्याजवळ असलेल्या शिलकी मालाच्या बाबतींत किंवा मालाच्या किंमतीवरील व्याजाचे बाबतींत जें नुकसान येईल त्याची नुकसान–भरपाई सरकारनें करावी अशी या परिषदेची विनंती आहे.

३२. ( अ ) मुंबई इलाख्यांत हल्लीं खतासाठीं फारच कमी पेंड उपलब्ध होऊं शकते. सदर पेंड मध्यप्रांतांतून मिळण्यासारखी आहे असें कळतें. तरी मुंबई सरकारनें त्या प्रांतिक सरकारकडून ती पेंड आणवून व जिल्हा व तालुका खरेदी–विक्री संघांना आयात परवाने देऊन व वहातुकीसाठीं साधनें उपलब्ध करून देऊन वेगवेगळया सहकारी खरेदी-विक्री संघांमार्फत शेतकऱ्यांस पुरविण्याची व्यवस्था करावी.

( आ ) सल्फेट ऑफ ॲमोनिआ या खताची एजन्सी सरकारनें दिली आहे. तरी या एजन्सीस इतर एजंटप्रमाणें सेल अँड परचेस सोसायट्या, तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स् वगैरे सहकारी संस्थांना एजन्सी देण्यास भाग पाडावें.

३३. शेतकऱ्यांचा गूळ हा मोठ्या प्रमाणावर बाजारांत येत असून रेल्वे वाहतूक बंद असल्यामुळें मालाची वाहतूक स्थगित झाली आहे. त्यामुळें शेतकऱ्यांचा माल न हलल्यामुळें बरेंच नुकसान होत आहे. तरी रेल्वे वहातूक शक्य तितक्या लवकर चालू करण्याबद्दल ही परिषद् सरकारला विनंती करीत आहे. रेल्वे वहातूक ताबडतोब सुरू करणें शक्य नसल्यास गुळाचा किमान दर ठरवून त्या दरानें सरकारनें स्वतः गूळ खरेदी करण्याची योजना त्वरेनें हातीं घ्यावी अशी या परिषदेची मागणी आहे.

३४. वांटपाचें काम करणाऱ्या सहकारी संस्थांनीं खरेदी केलेलीं साखरेचीं पोतीं ज्या दिवशीं साखरेवरील नियंत्रण उठलें त्याच दिवशीं फॅक्टरींतून पोतीं आणणें बंद झालें आहे व तीं अजूनपर्यंत फॅक्टरीमध्येंच आहेत. ती साखर त्या त्या संस्थांना विक्रीकरतां देण्याबद्दल सरकारला विनंती करणेंत येत आहे.

३५. वांटपाची पद्धत बंद झाल्यामुळें सहकारी खरेदी–विक्री संघांना नवीन धोरण आंखणें आवश्यक झालें आहे. खुल्या बाजारांत इतर व्यापाऱ्यांप्रमाणें सहकारी खरेदी–विक्री

संघांना स्वतःच्या जबाबदारीवर माळाची खरेदी विक्री करतां येत नाहीं. तेव्हां रेल्वे वगैरे सारख्या सरकारी व निमसरकारी खात्यांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना लागणाऱ्या खाद्योपयोगी व इतर जिनसांची खरेदीबाबतचीं कामें सहकारी खरेदी-विक्री संघांना देण्यांत यावींत अशी सरकारास व स्थानिक स्वराज्य संस्थांस या परिषदेची विनंति आहे.

## ( ६ ) कंझुमर्स विभाग

३६. कंझुमर्सना नित्योपयोगी लागणाऱ्या जिनसा ज्या नागरी व ग्रामीण, सरकारी अगर खाजगी कारखान्यांतून तयार होतात त्या कारखानदारांनीं आपल्या मालाच्या एजन्सीस प्रथम सहकारी सोसायट्यांना याव्यात अशी या परिषदेची सरकारला व कारखानदारांना विनंती आहे.

तसेंच मालाच्या वहातुकीचीं, दळणवळणाचीं साधनें उपलब्ध करून देण्याच्या बाबत सरकारनें सहकारी संस्थांना प्राधान्य द्यावें अशी ही परिषद सरकारला विनंती करते.

३७. नित्योपयोगी वस्तूंवरील नियंत्रणें निघाल्यानंतर कंझुमर्स को. सोसायट्यांना खुल्या व्यापाराच्या चढाओढीच्या दिवसांत आरंभीं तोंडमिळवणी करणें कठीण होणार आहे. म्हणून या पुढील काळांत सरकारनें कंझुमर्स को. सोसायट्यांना योग्य तें मार्गदर्शन करून व शक्य तेवढ्या सवलती देऊन आणि सरय्या कमिटीनें शिफारस केल्याप्रमाणें यापुढें निदान पांच वर्षे या सोसायट्यांना आपापल्या कचेऱ्यांसाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाच्या निदान निम्मीएवढी रक्कम आर्थिक मदत म्हणून देऊन त्यांना स्वयंसिद्ध व कार्यक्षम होण्याची संधी द्यावी अशी ह्या परिषदेची सरकारास विनंति आहे.

## ( ७ ) सर्वसाधारण व लँड मॉर्गेज बँक विभाग

३८. शेतकी पतपेढ्यांची कार्यक्षमता वाढावी या दृष्टीनें सोसायट्यांच्या सेक्रेटरींचें एक स्वतंत्र असें जिल्हानिहाय केडर करण्यांत यावें; व या योजनेची घटना सोसायट्यांच्या प्रतिनिधींनीं निवडलेल्या नियामक मंडळामार्फत व्हावी; व सोसायटीच्या सेक्रेटरींची वेतनश्रेणी–रजा–बढती–बदली–शैक्षणिकदर्जा वगैरे बाबींचे अधिकार या मंडळाला असावेत. या बाबतची तपशीलवार योजना प्रांतिक इन्स्टिट्यूटनें त्वरित आखावी अशी या परिषदेची शिफारस आहे.

३९. सहकारी संस्थांनी मिळविलेले लवाद निवाडे यांची बजावणी जितक्या तांतडीनें व्हावयास पाहिजे तितक्या तांतडीनें ती रेव्हिन्यू खात्याचे अंमलदारांकडून होऊं शकत नाहीं असें अनुभवास येत असल्यानें या परिषदेची अशी सूचना आहे कीं, हे निवाडे बजावणीचे जरूर ते अधिकार सहकारी खात्याचें अंमलदारांस देण्यांत यावेत; व लवाद निवाड्यांची बजावणी तात्काळ व्हावी याकरितां या सभेची सरकारला अशी शिफारस आहे कीं,

असिस्टंट रजिस्ट्रार यांना तंवाद न होतांच निर्विवादपणें थकलेल्या हप्त्यांची वसुली तांतडीनें होण्याकरितां सर्टिफिकेट देण्याचा अधिकार असावा. तसेंच वसुली अंमलदारांची नेमणूकही सहकारी खात्यानेंच करावी.

४०. जिल्हा युनियन बोर्ड व तालुका सुपरवायझिंग बोर्ड यांचें अधिकारक्षेत्र दिवसेंदिवस अधिकाधिक मर्यादित करण्याचा सहकारी खात्याचा उपक्रम चालू आहे असें या परिषदेचें नजरेस येत असल्याकारणानें सदर बोर्डांचे अधिकार पूर्वीप्रमाणेंच (१) मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमेन अगर प्रतिनिधी, (२) डिस्ट्रिक्ट युनियन बोर्डाचे चेअरमन व (३) असिस्टंट रजिष्ट्रार या तिघांच्या ॲड हॉक कमिटीचे देखरेखीखालीं राहतील असें धोरण यापुढें सहकारी खात्यानें आंखून सदर संस्था पूर्ववत् कार्यक्षम करण्याची तजवीज शक्य तितक्या लवकर करण्यांत यावी अशी या परिषदेची सरकारास विनंती आहे.

४१. सहकारी संस्थांना आपल्या व्यवहारासाठीं लागणारा पैसा पूर्वीप्रमाणें बिगर खर्चानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं तिजोरीमार्फत पाठवतां येईल अशी व्यवस्था करण्यांत यावी अशी या परिषदेची सरकारास विनंती आहे.

४२. इयत्ता ५ ते ७ साठीं ठेवण्यांत येणाऱ्या क्रमिक पाठ्य पुस्तकांत सहकारी चळवळीची माहिती देणारे धडे घालण्यांत यावेत; तसेंच ट्रेनिंग कॉलेजमध्यें या विषयाची विद्यार्थ्यांना माहिती होईल अशा प्रकारें अभ्यासक्रमांत जरूर तो फेरफार करण्यांत यावा अशी या परिषदेची सरकारास विनंती आहे.

४३. सरकारी कायद्याच्या कलम ७७ खालीं जी नोटीस सोसायट्यांस द्यावयास पाहिजे ती सोसायटी ही मुख्य अगर अनुषंगिक प्रतिवादी असली तरीही देणें अवश्य होईल अशी तजवीज जरूर तर कायद्यांत दुरुस्ती करूनही करण्यांत यावी.

४४. ज्या जिल्ह्यांतील प्राथमिक लॅन्ड मार्गेज बँकेचा व्यवहार तोट्यांत चालला आहे त्या बँकांचा तोटा भरून काढणेसाठीं सरकारनें आर्थिक मदत व इतर सवलती त्या बँकांना द्याव्यात.

४५. मुंबई शेतकी कर्ज निवारण कायद्याखालीं कलम ५५ अगर ३३ प्रमाणें कोर्टानें केलेले हुकूमनामे लँड मॉर्गेज बँकांनीं फेडावयाचे आहेत. सदर बाबतींत बँकांना कांहीं अंशीं तोटा येण्याचा संभव आहे असें आजच्या परिस्थितीवरून दिसतें. सदर तोट्याचा बँकांच्या पूर्वीच्या व इतर कामकाजावर परिणाम होऊं नये म्हणून होणाऱ्या भावी तोट्याबद्दल सरकारनें जरूर ती हमी घ्यावी अशी या परिषदेची शिफारस आहे.

४६ सहकारी खात्याच्या व्यवस्थेकरितां सध्या सोलापूर जिल्हा हा दक्षिण भागास जोडलेला आहे. परंतु भाषेच्या अडचणीमुळें कारभारांत पुष्कळ अडचणी येतात तरी सदर जिल्हा पूर्वीप्रमाणेंच मध्य भागास जोडावा अशी या परिषदेची आग्रहाची मागणी आहे.

४७. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी करण्याच्या हेतूनें व त्यांस स्वावलंबी कारण्याचे उद्देशानें शेती पद्धतींत सहकारी मार्गानें आधुनिकत्व आणणेसाठीं सहकारी पद्धतीनें शेती करणें अवश्य असल्यानें बेटर फार्मिंग सोसायटया, जॉइंट फार्मिंग सोसायटया, वगैरे स्थापन करण्याचे सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांनीं चिकाटीनें प्रयत्न करावेत.

४८ सध्यां तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनच्या घटनेकडे पहातां त्यांना कोणतेंही आर्थिक स्थैर्य नसल्यानें उद्देशाप्रमाणें जरूर त्या सुधारणा करतां येत नाहींत; व त्यांचें कामकाज विशेषत्वानें मुळींच होत नाहीं. तरीं सरकारनें घटना बदलून त्या अधिक कार्यक्षम कशा होतील याचा विचार ताबडतोब करावा अशी विनंती आहे.

पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ येथें आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर [ पो. ऑ. डेक्कन जिमखाना ] पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.